शनिवार, १ जुलै २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -२८७
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● SATURDAY 01 JULY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-287 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5


# मुंबईत मुसळधार पाऊस

## राज्यात पुढील पाच दिवस पावसाचा प्रभाव

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे : राज्यात उशिराने आलेला मान्सून आता स्थिरावला आहे. राज्यातील अनेक शहरांमध्ये पाऊस सुरु आहे. या पावसानंतर शेतकऱ्यांनी शेतीच्या कामांना वेग दिला आहे. शुक्रवारी मुंबई मुसळधार तर पुणे शहरामध्ये पावसाची संततधार सुरु आहे. आधी बिपरजॉय चक्रीवादळाने मान्सूनला रोखून धरले होते. परंतु वादळ शांत होताच आता मान्सूनने चांगलाच वेग पकडला आहे. पुणे हवामान विभागाने पावसासंदर्भात महत्वाची माहिती दिली आहे.**

राज्यात पुढील चार ते पाच दिवस पावसाचा प्रभाव असणार आहे. काही भागांत मुसळधार तर काही ठिकाणी अतीमुसळधार पाऊस पडणार आहे. यासंदर्भात काही भागांत ठिकाणी यलो अलर्ट तर काही ठिकाणी ऑरेंज अलर्ट दिला आहे. विदर्भ, मराठवाड्यात चांगला पाऊस होणार आहे. पश्चिम महाराष्ट्र, कोकणात मुसळधार पावसाचा अंदाज आहे. मुंबईत शुक्रवारी मुसळधार पाऊस झाला. या मुसळधार पावसानंतर अंधेरी भुयारी मार्ग पुन्हा एकदा काही काळासाठी बंद करण्यात आला. अंधेरी परिसरात सध्या पाऊस कमी झाला आहे. भुयारी मार्गातील पाणी काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत. तसेच मुसळधार पावसानंतर अंधेरी एसव्ही रोडवरही पाणी साचल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे.



● मुसळधार पावसामुळे मुंबई-अहमदाबाद महामार्गाला पावसाचा जोरदार फटका बसला आहे. मुंबई-अहमदाबाद महामार्गावर पाणी साचल्यामुळे वाहतूक जवळपास ठप्प झाल्यात जमा आहे. मुंबई-अहमदाबाद महामार्ग हा देशातील अतिशय महत्त्वाचा मार्ग आहे. या महामार्गातून प्रवासी वाहतुकीसोबतच अवजड वाहतूक देखील होत असते. पण जोरदार पावसामुळे या महामार्गावर काही ठिकाणी वाहतूक बंद सारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. या महामार्गावर ठिकठिकाणी पाणी साचले आहे.

● वसईतील ससू नवघर या ठिकाणी रस्त्यावर पाणी साचले आहे. रस्त्याच्या बाजूला डोंगर आहे. त्या डोंगराचे पाणी रस्त्यावर वाहून येते. पण हे पाणी समुद्राच्या दिशेला जाण्यासाठी अडथडे येत आहे. या पाण्याचा समुद्राच्या दिशेला जाण्यासाठी निचरा होत नाहीय. संबंधित परिसरात रस्त्यालगत बांधकाम झाले. नाले बुजवण्यात आले आहेत. त्यामुळे पाणी समुद्रात जाण्यासाठी अडथळा येतो. तर दुसरीकडे प्रशासन याकडे दुर्लक्ष करतंय, असा आरोप स्थानिकांकडून करण्यात येतोय. नालेसफाई झालेली नाही, असा स्थानिकांचा आरोप आहे.

# कांदा 'भाव' खाणार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** देशात कांद्याच्या दरवाढीची चर्चा यापूर्वी कित्येकदा झाली आहे. राज्य सरकारच नाही तर केंद्र सरकार पण कांद्याच्या वांद्यावरुन चिंतेत पडलेले आहे. कांदा दरवाढीची भीती अनेक राज्य सरकारांना माहिती आहे. पण सध्या देशात टोमॅटोने ग्राहकांच्या तोंडचे पाणी पळवले आहे. आता आणखी कांद्याची त्यात भर पडणार आहे. कांदा सर्वसामान्यांचा खिसा खाली करु शकतो. कांद्याच्या किंमतीत वाढ होण्याची शक्यता आहे. टोमॅटोनंतर आता कांदा सर्वसामान्यांना रडविण्याच्या तयारीत आहे. सुरुवातीला 80 रुपये किलो दराने टोमॅटो विक्री झाले. देशातील काही भागात टोमॅटोचा दर 100-120 रुपये प्रति किलोवर पोहचला. आता कांद्याचा क्रमांक आहे. काय आहे यामागील कारणे. केंद्र सरकारने कांदा उत्पादनाचे आकडे समोर आणले आहे. त्यानुसार, महाराष्ट्रातील पाच क्षेत्रात गेल्या महिन्यात कांद्याच्या किरकोळ किंमतीत वाढ झाली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत या किंमती कमी आहेत. सरकारी डेटानुसार, भारतात वर्ष 2020 मध्ये कांद्याच्या सरासरी किंमती 35.88 रुपये, 2021 मध्ये कांद्याच्या सरासरी किंमती 32.52 रुपये आणि 2022 मध्ये 28 रुपये प्रति किलो होत्या. 2023 मध्ये आतापर्यंत या किंमती स्थिर आहेत. पण येत्या काही महिन्यात या किंमती वाढू शकता. केंद्र सरकारने दोन महिन्यांअगोदर शेतकऱ्यांकडून जवळपास 0.14 दशलक्ष टन कांदा खरेदी केला. केंद्रीय मंत्री पियूष गोयल यांनी एप्रिल महिन्यात याविषयी घोषणा केली होती.



दिल्ली विद्यापीठात पोहोचण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी शुक्रवारी मेट्रोने प्रवास केला. विद्यापीठाच्या शताब्दी सोहळ्याच्या समारोप समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून मोदी व केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान उपस्थित राहणार आहेत. या प्रवासात मोदींनी प्रवाशांशी संवाद साधला.

# भाविकांवर काळाचा घाला

आधुनिक केसरी न्यूज

**सोलापूर :** अक्कलकोट येथे देवदर्शनासाठी आलेल्या भाविकांच्या वाहनाचा दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास भीषण अपघात झाला आहे. अक्कलकोट तालुक्यातील शीरवळवाडी वळणावर क्रूझर आणि सिमेंट वाहतूक करणाऱ्या ट्रकचा अपघात झाला आहे. या अपघातात ६ जणांचा मृत्यू झाला आहे.

अपघातातील सर्व भाविक हे कर्नाटक राज्यातील गुलबर्गा जिल्ह्यातील आळंद तालुक्यातील अणूर गावचे रहिवासी असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या भीषण अपघातात सहा ते सात जण गंभीर जखमी झाले आहेत. त्यांना ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. ग्रामीण रुग्णालय अक्कलकोट येथील डॉ. अंजुम सय्यद, डॉ. घंटे आदी डॉक्टरांची टीम जखमींवर तातडीने उपचार करत आहेत. अक्कलकोट येथील स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी अणूर (ता. आळंद, जि. गुलबर्गा) येथील महिला भाविक आले होते. स्वामी समर्थांच्या मंदिरात दर्शन घेउन परतत असताना क्रूझरची आणि सिमेंट ट्रकची समोरासमोर धडक झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. क्रूझरमधील महिला आणि लहान मुलांचा जागेवरच मृत्यू झाला आहे.




तीन ते चार जण गंभीर जखमी आहेत. त्यांना अक्कलकोट ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला.









विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

देवबाभळी असे निरस नाव असलेलं एखादं नाटक असेल असं कधी वाटलं नव्हतं, त्याहून आश्चर्याची गोष्ट म्हणजे ते संगीत नाटक असेल आणि त्याच्याही पुढची गोष्ट म्हणजे तो एक थरारून टाकणारा नाट्यानुभव असेल असंही कधी वाटले नव्हते. पण म्हणतात ना Truth is stranger than fiction. तसंच काहीसं माझं या नाटकाच्या बाबतीत झालं आहे. पुण्यातील वास्तव्यात हे नाटक पाहण्याचा योग आला आणि जे पाहिले त्यामुळे भरून पावलो. हे नाटक पाहिलं नसतं तर एका चांगल्या आनंदाला निश्चितच मुकलो असतो.
खरं तर हे नाटक आहे संत तुकारामांची पत्नी आवली आणि विठूरायाची पत्नी देवी रुख्मिणी यांच्यावर. या नाटकात केवळ या दोघींच्याच भूमिका आहेत. तुकाराम महाराज आणि विठ्ठल यांचा उल्लेख वारंवार झाला तरी या नाटकात पात्र म्हणून प्रत्यक्षात रंगमंचावर ते कधीच येत नाहीत पण ते अवघे नाटक व्यापून उरले आहेत. त्यांचे अस्तित्व सतत जाणवत राहते. मग प्रश्न असा आहे की देवबाभळी हे नाव आले तरी कसे ? यासाठी नाटकाचे लेखक आणि दिग्दर्शक असलेल्या प्राजक्त देशमुख यांना त्याचे श्रेय द्यावे लागेल. तुकारामांची पत्नी आवली हिच्या पायात बाभळीचा काटा मोडतो. तो काटा काढण्यासाठी कोण मदत करतं तर प्रत्यक्ष विठुराया. विठुरायाने पायातला काटा काढला तरी पायातल्या वेदनेची आणि जखमेची ठसठस घेऊन आवली नाटकभर वावरते. विठुराया केवळ तेवढं करून थांबत नाही, तर तिच्या मदतीला आपली पत्नी रुख्मिणी हिला पाठवतो. त्यावेळी आवली पोटुशी असते. देवबाभळीचा काटा मोडणं हे खरं तर निमित्त ! पण या निमित्ताने विठुरायाचे आपल्या भक्तांवरील प्रेम दिसते. या निमित्तानेच रुख्मिणी आवलीच्या घरी येते. या दोघींचंही दुःख कुठेतरी एकसमान आहेत. पण त्या दोघींच्या मनातील वेदना, स्त्री सुलभ भावना आणि आपल्या पतीबद्दल असलेलं प्रेमही यानिमित्ताने दिसून येतं. या सगळ्या गोष्टींना कारण ठरते ती देवबाभळी ! नाटकाचा पडदा उघडतो आणि शेणानं आपलंअंगण सारवणारी आवली दृष्टीस पडते. सारवताना ती गात असते. **क्रमशः**




## संगीत देवबाभळी



## आनंदी पहाट

## वर्तमानातील प्रत्येक संधीची जाणीव होणे आवश्यक

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपण वर्तमानांत आपले जीवन जगत असताना खरे तर सद्यःस्थितीचा आणि नजीकच्या भविष्यकाळाचा विचार करणे महत्वाचे, गरजेचे आणि म्हणूनच आवश्यक असते. आपण वर्तमानातील जीवन जगताना प्राप्त परिस्थितीचा आनंद लुटण्याच्या ऐवजी भूतकाळाचे गोडवे गात बसतो. मी असे केले होते, तसे केले होते, माझ्यासारखे कोणी काही करूच शकले नव्हते, माझ्याकडे एवढा पैसा होता, मी सर्वांत अधिक व्यवसाय केला होता वगैरे वगैरे.... ह्या सर्वच घटना भूतकाळातल्या असतात, त्याचेच आपण सदोदित कौतुक करत रहात असतो. भूतकाळाचे भूतच जणू काही आपल्या मनाचा ताबा घेऊन सर्वत्र टेंभा मिरवत असते. वर्तमानातल्या मी चा त्यामुळेच आपल्याला विसर पडलेला असतो. मागील काळात, गत आयुष्यात, भूतकाळात मी कधी, कसा, कोण, कोठे आणि काय होतो, ह्यापेक्षा सद्यःस्थितीत, वर्तमानकाळात, आज मी कसा, कोण, कोठे आणि काय आहे आणि ते सुद्धा का ? कोणत्या कारणानं ? ह्याचा प्रकर्षाने आणि प्राधान्याने, सातत्याने आणि साकल्याने अभ्यासपूर्वक विचार करत राहणे गरजेचे असते. मी कालच्या पेक्षाही आज सरस, प्रगत होणे आवश्यक आणि म्हणूनच महत्वाचे असते. आपल्या आयुष्यात अथवा इतरत्र काय घडले आहे, हे आपल्याला माहिती असतेच किंवा ते कालांतराने माहिती होतेच. कालची, भूतकाळातील माहिती आपल्या सर्वांनाच उपलब्ध होत असते. वर्तमानात राहून भूतकाळातल्या अनुभवांबरोबर सतत राहणे हे नेहमीच उपयोगाचे ठरते असे नाही. प्राप्त परिस्थितीत काहीवेळा उपलब्ध झालेल्या अनेक चांगल्या संधी आपण गमावू शकतो. ह्याचे नुसते ज्ञान असून चालत नाही तर त्या संधीचे सोने करण्याचे भान आपल्याला असणे आवश्यक असते.



आधुनिक केसरी

### हरिचे भजन | परमानंद ||

वचाळाचा संग | नको करू मना ||
काळ कामाविना | घालू नको ||१||
क्षण अनमोल | जाण एक वर्म ||
आपुला स्वधर्म | सोडू नको ||२||
भुकेल्या जीवाचा | अंत नको पाहू ||
माऊलींचा काऊ | जपे सदा ||३||
ज्ञानियांचा संग | सुखाचा सोहळा ||
दाटतो उमाळा | चैतन्याचा ||४||
अभंगाच्या दारी | ओवीची गुंजन ||
अद्वैत चिंतन | हरिनामी ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण


आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

पुष्पैः सुशोभितां देवीं
मङ्गलां परमां शिवाम्|
अभीष्टफललाभाय दुर्गां देवीं
नमाम्यहम्|| ३२ ||
पुष्पांनी सुशोभित, मंगल, श्रेष्ठ, देवीला, शिवेला म्हणजे तुला दुर्गा देवीला मी अभीष्टफलाच्या प्राप्तीसाठी नमन करतो.

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

आज रहो कल्ह नहिं रहो,
क्या जीवन परमान ।
अन्ध जीव क्यों भूलहूँ, भज ले पुरुष पुरान
।।५२।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल षष्ठ अध्याय)
०४/०६/५२ मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
जीवन आज आहे उद्या राहील की नाही, याचा भरवसा नाही. हे ज्ञानचक्षु हीन जीवांनो ! या अनित्य मायेत काय भुललात ? तुम्ही नित्य-अनादी परम पुरुषाची उपासना करा.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## स्थूलपंचमहाभूते

आधुनिक केसरी




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

पण ब्रम्ह शून्य नाही. ब्रम्ह हे आनंदमय आहे. म्हणून आकाशमय व्रुत्ती झाली तरी स्वरूपमय दर्शन झालेले नाही ।हे कधीही विसरू जाऊ नये. मनाची उन्मन अवस्था म्हणजे झाली की परब्रम्हाचे दर्शन झाले की मनाची स्थिती स्थिर रहाते. म्हणून म्हणतात की शुन्याच्या पलीकडे जाऊन मन उन्मन होते तेव्हा ब्रम्ह दर्शन घडते. व आयुष्यात असलेल्या अवगुणांचा विचार करून सगुण गुण आत्मसात करता येतात.

## निराभिमानी परोपकार ही भगवंताची सेवाच

आधुनिक केसरी

प्रत्येक मनुष्याला परोपकाराची बुद्धी असणे अत्यंत जरूर आहे. पण तो कुणाला शक्य आहे आणि कुणी करावा, याचा विचार करायला पाहिजे. ज्या शेतात पाणी भरपूर पुरून उरत असेल त्याच शेतातले पाणी बाहेर टाकता येते, आणि ते हितावहही होते. इतर शेतांच्या बाबतीत ते होत नाही, अशा शेताला पुरेसे पाणी कसे मिळेल याचाच आधी विचार करणे जरूर आहे. हीच दृष्टी परोपकार करणार्या व्यक्तीने ठेवावी. ज्या महात्म्यांनी स्वतःचा उद्धार करून घेतला, जगाच्या कल्याणाकरिताच जन्म घेतला,त्यांनाच परोपकाराचा अधिकार.
मग प्रश्न येतो की, इतरांनी परोपकाराची बुद्धी ठेवू नये आणि तसा प्रयत्नही करू नये की कायतर तसे नाही. परोपकाराची बुद्धी आणि प्रयत्न असणेच जरूर आहे. परंतु परोपकार म्हणजे काय, आणि त्याचा दुष्परिणाम न होऊ देता तो कसा करता येईल, हे पाहणे आवश्यक आहे. भगवंताची सेवा या भावनेने दुसऱ्या करिता केलेली मेहनत याला परोपकार म्हणता येईल, आणि त्यापासून नुकसान होण्याची भिती नाही. परंतु हे वाटते तितके सोपे नाही. कारण



मनुष्याची सहज प्रवृत्ती अशी की, थोडेसे काही आपल्या हातून झाले की, "ते मी केले, मी असा चांगला आहे," अशा तऱ्हेचा विचार येऊन तो अभिमानाला बळी पडतो.
सबब, ज्या ज्या वेळी दुसऱ्या करिता काही करण्याची संधी मिळेल त्या त्या वेळी तिचा फायदा घेऊन मनाला शिकवण द्यावी की, "देवा,तुझ्या सेवेचा लाभ मला दिलास ही कृपा झाली. अशीच कृपा ठेवून आणखी सेवा करवून घे." ही विचारसरणी जागृत राहिली नाही, तर आपला कसा घात होईल याचा पत्ताच लागणार नाही. म्हणून अत्यंत जपून वागणे जरूर आहे. परोपकार याचा सरळ अर्थ पर-उपकार; म्हणजे दुसऱ्या वर केलेला उपकार. यावरून असे लक्षात येईल की, परोपकाराला दोन व्यक्तींची गरज लागते. एक उपकार करणारा, आणि दुसरा उपकार करून घेणारा. जगातल्या सर्वसामान्य व्यक्ति पाहिल्या, तर आपल्या स्वतःवरून असे दिसते की, मी एक निराळा, आणि प्रत्येक व्यक्ति आणि वस्तुमात्र गणिक सर्व जग निराळे. मनाच्या या ठेवणीमुळेच जर आपल्या हातून दुसऱ्याचे कधीकाळी एखादे काम होण्याचा योग आला, तर 'मी दुसर्याचे काम केले'ही जाणीव होऊन अहंकार झपाट्याने वाढू लागतो. म्हणून परोपकाराच्या बाबतीत अत्यंत सावध राहण्याची सूचना सर्व संतांनी दिली आहे. नामात राहिले म्हणजे अहंकार नाहीसा होऊन सावधानता येते आणि चित्त शांत होते. बोधवचन :जगात परोपकारी म्हणून नावाजलेले, पण भगवंताचे अधिष्ठान नसलेले. मोठेमोठे लोकसुद्धा मानाबिनात कोठेतरी अडकल्यावाचून राहणार नाहीत.
**प्रवचने :श्री सद्गुरू ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

## सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी



विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

**मला काही कळत नाही असे ज्याला वाटते तोच गुरू करील. मी 'राम राम' म्हणतो, वाईट मार्गाने जात नाही, मग गुरू कशाला हवा, असे काहीजण म्हणतात. 'मी' केले ही जाणीव आड येते, म्हणून सद्गुरूची आवश्यकता आहे. एखादा रुपया आपण उचलला तर त्याच्या दोन्ही बाजू जशा एकदमच येतात, त्याप्रमाणे आपण प्रपंचात पडलो की आपल्याला परमार्थ हा पाहिजेच. परमार्थात भगवंताची गरज असते. क्रमशः**

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

**ऋणशेपश्चाविशेषः शत्रुशेपस्तथैव च ।
पुनः पुनः प्रवर्तन्ते तस्माच्छेषं न रक्षयेत् ॥
सरलार्थ - कर्जाचा शेष ( अल्पसाही भाग ), अग्नीचा शेष आणि त्याचप्रमाणे शत्रूचा शेष हे पुनः पुनः पुढे येतात. म्हणून ( या तिघांचा) शेष राखू नये. स्पष्टीकरण - एखाद्याचे कर्ज सगळेच्या सगळे फेडून टाकावे. शिल्लक राहिल्यास तेच वाढत जाते. आग समूळ विझवावी. एखादी ठिणगी जरी शिल्लक राहिली, तरी ती पुन्हा पेट घेते. शत्रू चालून आला तर त्याचा पुरता बीमोड करावा. त्याला अर्धवट सोडल्यास तो आज ना उद्या मोठा होऊन आपणास उपद्रव देऊ शकतो.**

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

शनिवार, १ जुलै २०२३





कृषी दिवस पान ६





महापुरुष जगाचा पोशिंदा...! पान ७


## पिकअपला अपघात ३३ महिला जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**गोंदिया :** देवरी तालुक्यातील बोरगाव ( डवकी ) येथून रोवणीच्या कामासाठी फुक्कीमेटा येथे सुमारे ३३ महिला मजुरांना वाहून नेणाऱ्या पिकअप वाहनाला अपघात झाल्याने महिला मजूर जखमी झाल्याची घटना आज शुक्रवारी सकाळी साडेअकरा वाजताच्या सुमारास देवरीजवळील डवकी गावाजवळ घडली. या घटनेची नोंद देवरी पोलिसांत करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

देवरी तालुक्यामध्ये रोवणीच्या कामाला सुरुवात झाल्याने अनेक शेतकरी बाहेरगावावरून मजुरांची ने-आण करतात. अशाच प्रकारे तालुक्यातील बोरगाव येथून सुमारे ३३ महिला मजूर रोवणी कामासाठी फुक्कीमेटा येथे सकाळी ११ वाजताच्या सुमारास पिकअप वाहनाने ( एमएच ३३ जे ०५१ )जात असताना वाहन चालक प्रवीण विनायक राऊत याचा वाहनावरील ताबा सुटल्याने रस्त्याच्या कडेला असलेल्या शेतात हे वाहन उलटले. यामुळे वाहनात असलेले सर्व मजूर जखमी झाले. जखमींना देवरीच्या ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. गंभीर जखमींना पुढील उपचारासाठी गोंदिया येथे जिल्हा सामान्य रुग्णालयात रवाना करण्यात आले आहे.

# एमआयटी कॉलेजच्या मनमानी कारभाराला युवासेनेकडून चोप

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** येथील एमआयटी महाविद्यालयामध्ये ११ विद्यार्थ्यांना निलंबित केले होते. तसेच प्रत्येकी ५ हजार रूपयांचा दंड आकारत  दंड न भरल्यास परीक्षेला कोणत्याही विद्यार्थ्यांला बसू देणार नाही, असे आदेश काढले होते.

यानंतर पालक वर्गाने आणि विद्यार्थ्यांनी युवासेना छत्रपती संभाजीनगर येथील पदाधिकारी यांना संपर्क केला. युवासेनेने महाविद्यालय प्रशासनाला जाब विचारताच एमआयटी महाविद्यालय प्रशासनाने ११ विद्यार्थीचे निलंबन मागे घेतले व दंडही माफ केला. यावेळी पालक आणि विद्यार्थ्यांनी युवसेनेनेचे आभार मानले. यावेळी युवासेना जिल्हा सरचिटणी मिथुन व्यास, किरण तुपे, उपशहर अधिकारी अजय चोपडे, सागर वाघचौरे आदींची उपस्थिती होती.





**न्यू बिगिनिंग इंटरनॅशनल स्कूलमध्ये पदग्रहण समारंभ उत्साहात संपन्न झाला. यावेळी सचिव जेम्स डोंगरदिवे, संचालिका पल्लवी डोंगरदिवे यांची प्रमुख उपस्थिती होती. नवनिर्वाचित परिषदेचे जेम्स आणि पल्लवी यांनी बॅचेस आणि सॅशेस बहाल करून अभिनंदन केले. नेतृत्व, एकता, शिस्त आणि नैतिकता या बाबतीत निष्पक्ष आणि प्रामाणिक राहण्याबद्दल त्यांना संबोधित केले. परिषदेने शाळेचा आदर्श जोपासण्याची शपथ घेतली.**

## श्यामराव बोधनकर व इंद्रायणी बोधनकर स्मृती पुरस्कार सोहळ्याचे आज आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** येथे शामराव बोधनकर व इंद्रायणी बोधनकर स्मृती पुरस्कार सोहळ्याचे आयोजन छत्रपती गोविंदभाई श्रॉफ सभागृहात शनिवार दि. १ जुलै रोजी सायं. ५.३० वाजता केलेले आहे. यंदाच्या शामराव बोधनकर स्मृती पुरस्काराचे मानकरी आहेत ज्ञानेश्वर मुळे जे राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे निवृत्त राजदूत आहेत. तसेच इंद्रायणी मधुकर बोधनकर स्मृती पुरस्काराचे यंदाच्या मानकरी आहेत वर्षा ठाकूर - घुगे ज्या मुख्य कार्यकारी अधिकारी





तथा लोकाभिमुख प्रशासक आहेत. पुरस्कार सोहळ्यासाठी आपणं मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन डॉ. पी.डी.जोशी पाटोदेकर , डॉ.राघवेंद्र चाकुरकर , डॉ.उर्मीला चाकुरकर , आणि अभय व महेंद्र बोधनकर यांनी प्रसिद्ध करण्यात आलेल्या एका पत्रकाद्वारे कळविले आहे.

# महाराष्ट्र १० वर्षे मागे गेला

## नाना पटोले : हे ‘कुराज्य’ लवकर जावे

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** महाविकास आघाडीचे सरकार कटकारस्थान करुन



पाडले व शिंदे-फडणवीस यांचे सरकार स्थापन होऊन वर्ष झाले. हे एक वर्ष गद्दारी, राज्यातील जनतेशी केलेली बेईमानी तसेच दिल्लीच्या इशाऱ्यावर महाराष्ट्राला १० वर्ष अधोगतीकडे घेऊन जाणारे ठरले आहे. राज्यात हे असंवैधानिक, असंवेदनशील, भ्रष्ट  ‘कुराज्य’ असावे असे स्वाभिमानी जनतेला अजिबात वाटत नसून लवकरात लवकर जावे हीच जनतेची इच्छा आहे, असा घणाघाती हल्ला महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे.

शिंदे-फडणवीस सरकारच्या वर्षपूर्तीवर हल्लाबोल करत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष पुढे म्हणाले की, हे सरकार स्थापन करताना घेतले गेलेले सर्व निर्णय सुप्रीम कोर्टानेच चुकीचे ठरवले आहेत. राजभवनचा गैरवापर करुन, आमदारांना ईडी, सीबीआयची भिती घालून ‘खोके’ देऊन सरकार स्थापन करण्यात आले. हे सरकारच असंवैधानिक आहे पण सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानंतरही ईडी सरकार खुर्चीला चिकटून बसले आहे. वर्षभरात या सरकारने एकही कल्याणकारी निर्णय घेतलेला नाही. अतिवृष्टी व गारपीटीने शेतकरी संकटात सापडला असताना सरकार मदतीची केवळ घोषणा करते पण एक दमडीही शेतकऱ्यापर्यंत पोहचत नाही. सोयाबीन, कांदा, कापूस, कोणत्याही शेतमालाला भाव नाही, सोयाबीन, कापूस शेतकऱ्यांच्या घरात पडून आहे. शिंदे सरकारच्या जुलै २०२२ ते जानेवारी २०२३ या सात महिन्यांच्या काळातच राज्यात १०२३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या, दर १० तासाला एक आत्महत्या करत आहे. महाराष्ट्र औद्योगिकदृष्ट्या

> राज्यातील कायदा सुव्यवस्था बिघडलेली असून मागील चार महिन्यात २० ठिकाणी दंगली घडवून आणल्या . ईडी सरकारच्या काळात महिला सुरक्षित नाहीत, मुंबई हे देशात महिलांसाठी सुरक्षित शहर असा नावलौकिक होता पण लोकलमध्ये मुलींवर अत्याचार होत आहेत, महिलांच्या हत्या वाढल्या आहेत, राज्यातील ४ हजारांपेक्षा जास्त महिला व मुली गायब झाल्या आहेत, पुण्यासारख्या शहरातही दिवसाढवळ्या मुलीवर कोयत्याने हल्ला होतो . राज्याला पूर्णवेळ गृहमंत्री नाही, सहा– सात विभागाचा कारभार, सहा जिल्ह्यांचे पालकमंत्रीपद व राजकीय साठमारीतून त्यांना गृहविभागाकडे लक्ष देता नाही . सत्ताधारी पक्षाचे आमदार खासदारच नाही तर आता मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्रीही विरोधकांना जाहीरपणे धमकी देत आहेत . ईडी सरकारच्या काळात गुन्हेगार मोकाट व पोलीस प्रशासन सुस्त आहे . केवळ विरोधी पक्षांच्या लोकांवरच कारवाई केली जात आहे .

नेहमीच आघाडीचे राज्य राहिले आहे, हा लौकीकही ईडी सरकारने घालवला आहे. वेदांता-फॉक्सकॉन सारखा १.५ लाख कोटी रुपयांची गुतंवणुक व १ लाखांपेक्षा जास्त रोजगार निर्मितीचा प्रकल्प गुजरातला दिला. टाटा एअरबस प्रकल्प, बल्क ड्रग पार्क, मेडिकल डिवाईस पार्क, मरिन अकॅडमी, हे सर्व मोठे उद्योग महाराष्ट्राबाहेर गेले. उद्योग राज्याबाहेर गेल्यामुळे २ लाखांपेक्षा जास्त रोजगारही गेले. राज्यातील ३५ लाख विद्यार्थी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परिक्षांची तयारी करतात पण या परिक्षा वेळेवर होत नाहीत, सावळागोंधळ सुरु आहे. अधिकारी बनवण्याचे स्वप्न बाळगलेल्या गावखेड्यातील गरिब, सामान्य कुटुंबातील मुलांच्या भवितव्याशी खेळ सुरु आहे. ईडी सरकार हे शेतकरी, कष्टकरी, अल्पसंख्याक, दलित, वंचित विरोधी आहे. काम काहीही न करता केवळ इव्हेंटबाजी व जाहीरातबाजीवर जनतेच्या पैशाची उधळपट्टी सुरु असून महाराष्ट्रातही डबल इंजिन सरकार  डिरेल ( Derail ) झाले आहे, जाहिरातबाजी करून सुराज्य येत नसते त्यासाठी जनतेच्या हिताचे काम करावे लागते असेही काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले.




# कपिल देव यांची खंत

आधुनिक केसरी

आयसीसीने ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये भारतात होणाऱ्या वन डे वर्ल्ड कप २०२३चे वेळापत्रक जाहीर केले आहे. यजमान भारत ८ ऑक्टोबरला ऑस्ट्रेलियाविरुद्ध आपल्या मोहिमेला सुरुवात करेल. १५ ऑक्टोबरला भारताचा कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानशी सामना होणार आहे. टीम इंडियाचा १० वर्षांचा ICC ट्रॉफीचा दुष्काळ संपवण्याचा प्रयत्न असेल. मात्र, अनेक स्टार क्रिकेटपटूंच्या दुखापतींमुळे भारतीय छावणीत सध्या थोडी चिंता आहे. वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह आणि श्रेयस अय्यर हे अनेक महिन्यांपासून भारतीय संघातून बाहेर आहेत. विकेटकीपर ऋषभ पंत एका भीषण कार अपघातामुळे बाहेर आहे. आयपीएल २०२३मध्ये के.एल. राहुलला दुखापत झाली होती. भारतीय संघाचा माजी कर्णधार कपिल देव यांनी स्टार अष्टपैलू खेळाडू हार्दिक पांड्याच्या फिटनेसवर चिंता व्यक्त केली आहे. दुखापतींमुळे यापूर्वीही खेळाडूंचे करिअर उद्ध्वस्त झाले आहेत, याकडे देव यांनी लक्ष वेधले. १९८३च्या विश्वचषक विजेत्या कर्णधाराला टीम इंडियाच्या जखमी खेळाडूंबद्दल विचारण्यात आले. या प्रश्नाला उत्तर देताना कपिल देव म्हणाले की, दुखापतीमुळे जर भारतीय संघातील प्रमुख खेळाडूंना वगळले नाही तर संघ विश्वचषक २०२३ आधी मजबूत होईल. कपिल देव म्हणाले, दुखापती हा प्रत्येक खेळाडूच्या आयुष्याचा भाग असतो. मला आशा आहे की परिस्थिती सुधारेल. मला नेहमीच हार्दिक पांड्याबद्दल काळजी वाटते. तो खूप लवकर जखमी होतो. जर सर्व खेळाडू तंदुरुस्त असतील तर भारतासारखा मजबूत संघ दुसरा कोणताच नाही. लक्षात घ्या की ऋषभ पंत, के.एल. राहुल, श्रेयस अय्यर आणि जसप्रीत बुमराह दुखापतींमुळे निवडीसाठी उपलब्ध नाहीत. भारतीय संघाला २०२३ विश्वचषकापूर्वी आपल्या प्रमुख खेळाडूंनी पूर्ण तंदुरुस्त होऊन संघात परतावे असे वाटते. कपिलने भारतीय खेळाडूंचे कसोटी आणि टी२० आंतरराष्ट्रीय सामने काही काळ थांबवण्याची सूचना केली. "एकदिवसीय विश्वचषकाची तयारी सुरू करावी", असे ते म्हणाले. कपिल पुढे म्हणाले, "हे बघा, हा विश्वचषक चार वर्षांनंतर येतो, त्यामुळे तुम्ही पूर्ण तयारीनिशी असायला हवे. आम्हाला मॅच सरावाची गरज आहे. आणखी काही एकदिवसीय सामने खेळायचे आहेत.

# शेतकऱ्यांचा राजा

आधुनिक केसरी



माधव बैलकवाड
संपर्क 9545013082

**वसंतराव नाईक हे प्रगतीशील शेतकरी, कृषीशास्त्रज्ञ आणि राजकारणी होते. त्यांचा जन्म १ जुलै १९१३ रोजी झाला. त्यांनी प्रदीर्घ काळ महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून काम केले. नाईक यांचा जन्म यवतमाळ जिल्ह्यातील पुसद गावाजवळील गहुली या छोट्याशा गावात एका संपन्न शेतकरी कुटुंबात झाला. त्यावेळी ते पुसदचे नगराध्यक्ष होते. महाराष्ट्रात, हरित क्रांती, पंचायत राज, श्वेतक्रांती आणि रोजगार हमी योजनेची स्थापना करण्याचे श्रेय नाईक यांना जाते. या शेरेबाजीत नाईक यांचा गौरव करण्यात आला. १९७२ मध्ये महाराष्ट्रातील भीषण दुष्काळात त्यांनी शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी पुढाकार घेतला. नाईक यांना 'ग्रीन वॉरियर' आणि 'शेतकऱ्यांचा राजा' म्हणूनही ओळखले जाते.**

भारतीय समाजशास्त्र आणि राजकारणात नाईक घराणे सर्वात प्रसिद्ध आहे. १९६२ पासून नाईक घराण्याला निर्विवाद विजय मिळाला आहे. त्याचे खरे आडनाव राठोड होते आणि तो रणसोट क्षत्रिय जमातीचा होता. चतुरसिंग राठोड यांनी गहुलीची वस्ती बांधली. त्यांनी परिसर वसवला आणि बंजारा लोकांसाठी एक स्थिर वातावरण उपलब्ध करून दिले. परिणामी, तो बंजारा समाजाचा प्रमुख बनला आणि त्याचे आडनाव बदलून नाईक ठेवण्यात आले. चतुरसिंह नाईक यांचा मुलगा फुलसिंग हा समाजाचा नाईक बनला. राजूसिंग आणि हाजूसिंग ही त्यांची दोन मुले त्यांना व त्यांच्या पत्नी हुंकीबाई यांना झाली. हजूसिंगचे नाव छोटे बाबा होते. पुढे ते वसंतराव नाईक म्हणून ओळखले जाऊ लागले आणि त्यांना वसंतराव हे नाव देण्यात आले. नाईक घराण्यातून महाराष्ट्राला दोन यशस्वी मुख्यमंत्री लाभले आहेत. नाईक त्यांच्या विकास आणि प्रेरणादायी उपक्रमांमुळे 'महानायक वसंतराव नाईक' म्हणून प्रसिद्ध आहेत.


वसंतरावांचे प्राथमिक शिक्षण अनेक गावात झाले. पुढे त्यांनी बी.ए.साठी नागपूरच्या मॉरिस कॉलेजमध्ये प्रवेश घेण्यापूर्वी विठोली आणि अमरावती येथे माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. पदवी (१९३८) आणि LL.B. (नंतर) (१९४०). विद्यार्थी म्हणून महात्मा जोतिबा फुले आणि डेल कार्नेगी यांच्या शिकवणीचा त्यांच्यावर प्रभाव होता. कॉलेजमध्ये असताना नागपूरच्या घाटे येथील एका ब्राह्मण कुटुंबाशी त्यांची भेट झाली.

१९४१ मध्ये त्यांनी वत्सलाताई घाटे या आंतरजातीय जोडप्याशी विवाह केला. या लग्नामुळे दोघांनीही काही काळ घरापासून दूर घालवला. गरीब, शेतकरी आणि आदिवासींची वकिली करणारे सामाजिक जबाबदार वकील म्हणून त्यांची ख्याती होती. वत्सलाताई बी.ए. वसंतरावांसोबत काम करणारे समाजसेवक होते. निरंजन आणि अविनाश अशी त्यांच्या दोन मुलांची नावे आहेत.

वसंतरावांनी कायद्याची पदवी घेतल्यानंतर पुसद येथे वकिली सुरू केली. अखेरीस तो वकील बनला आणि त्याची आर्थिक परिस्थिती सुधारली आणि त्याची प्रतिष्ठाही वाढली. ते पुसद कृषी मंडळाचे अध्यक्ष (१९४३-४७) झाले. त्यांनी हरिजन वसतिगृह आणि राष्ट्रीय वसतिगृह (दिग्रस) चे अध्यक्ष म्हणूनही काम पाहिले. १९४६ मध्ये ते काँग्रेसचे सदस्य झाले. १९५१ ते १९५२ पर्यंत त्यांनी मध्य प्रदेशच्या केंद्रीय सहकारी बँकेचे संचालक म्हणून काम पाहिले. १९४६ ते १९५२ पर्यंत त्यांची पुसद नगरपालिकेचे प्रमुख म्हणून निवड झाली.

पहिल्या निवडणुकीत मध्य प्रदेश राज्यातील महसूल उपमंत्री म्हणून त्यांची निवड झाली. १९५६ मध्ये राज्याची पुनर्रचना झाल्यानंतर विदर्भ आणि मराठवाडा हे मुंबई द्विभाषिक राज्याचा भाग होते. यशवंतरावांच्या कारभारात वसंतरावांना कृषी मंत्री म्हणून नियुक्त करण्यात आले.

१९६० मध्ये महाराष्ट्र स्वतंत्र राज्य झाल्यानंतर ते पहिले



महसूल मंत्री झाले. १९६२ च्या निवडणुकीनंतर ते कन्नमवार यांच्या सरकारमध्ये महसूल मंत्रीही होते; तरीसुद्धा, कन्नमवार यांच्या मृत्यूनंतर, त्यांची मोठ्या बहुमताने (१९६३) महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी निवड झाली.

१२ वर्षे ते या पदावर होते. या काळात त्यांनी महाराष्ट्रात अनेक सुधारणा राबवल्या. आपल्या कारकिर्दीत त्यांनी आधार निर्माण करून महाराष्ट्राची उभारणी केली. महाराष्ट्राला अन्नधान्यामध्ये स्वयंपूर्ण करण्यासाठी प्रथम त्यांनी शेतीतील अडचणींवर काम केले. १९६५ मध्ये त्यांनी जाहीर केले की, "महाराष्ट्र दोन वर्षांत अन्नधान्यात स्वयंपूर्ण झाला नाही तर मी स्वतःला फाशी घेईन." त्यांची प्रशासकीय वृत्ती अगदी वास्तववादी होती. दारूवर बंदी घालण्याचे काँग्रेसचे उद्दिष्ट असूनही, त्यांनी महाराष्ट्रातील कायदा सैल केला, सभ्य मद्य जनतेसाठी अधिक सुलभ केले आणि हस्तकलेला परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. ते कोणतेही आव्हान सोडवण्यासाठी विचारमंथन आणि तडजोड वापरतील. त्यांनी शिक्षण, शेती आणि इतर क्षेत्रात अनेक प्रगती केली. रोजगार हमी योजना संपुष्टात आली आहे. देशात प्रथमच चार कृषी संस्थांची स्थापना करण्यात आली. राज्यात औद्योगिकीकरणाचे जाळे विणले जात आहे.

इलेक्ट्रिकल आणि थर्मल दोन्ही पॉवर प्लांट्स आधीच सुरू आहेत. महाराष्ट्रात पाझर तलाव आणि वसंत बंधारा निर्माण करण्याचे सर्व श्रेय वसंतराव नाईक यांनाच आहे. २० फेब्रुवारी १९७५ रोजी शंकरराव चव्हाण यांची महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी निवड झाली. त्यानंतर वसंतरावांनी त्यांच्या जिल्ह्यात मानवतावादी कार्य करण्यास सुरुवात केली आणि मार्च १९७७ मध्ये सार्वत्रिक निवडणुकीत ते लोकसभेवर निवडून आले.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती आणि अभ्यासक्रम मंडळ (बालभारती), महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती आणि अभ्यासक्रम मंडळ (बालभारती), महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती आणि अभ्यासक्रम मंडळ (बालभा बाल किशोर आणि जीवन शिक्षण मासिक निर्मिती. वसंतराव नाईक यांनी कृषी-उद्योग क्षेत्रात विलक्षण कार्य केले आहे. ते हाडाचे शेतकरी होते. त्याशिवाय शेती आणि धुळीची त्यांना आवड होती. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य शेती आणि शेतकरी कल्याणासाठी समर्पित केले होते. त्यांनी असे न्यायनिवाडे केले ज्यामुळे मोठ्या संख्येने क्रांतिकारक शेतकऱ्यांना फायदा झाला. त्यांनी पुसद येथील बाबासाहेब नाईक अभियांत्रिकी महाविद्यालयाची स्थापना केली आणि दोन्ही संस्थांच्या व्यवस्थापकीय समितीवर काम केले. महाराष्ट्रातील यवतमाळ येथील श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे नामकरण करून त्यांचा गौरव करण्यात आला. चिन्मय मांडलेकर अभिनीत त्यांचा बायोपिक, महानायक वसंत तू, २०१५ मध्ये मराठीत प्रदर्शित झाला.

त्यांच्या या प्रेरणादायी कार्याची दखल घेण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांनी १९८९ मध्ये त्यांचा वाढदिवस कृषी दिन म्हणून घोषित केला. तेव्हापासून शासनाच्या सर्व स्तरातून त्याचे स्मरण केले जात आहे. दुसरीकडे एकनाथ पवार यांनी शेतकऱ्यांच्या काठावर कृषी दिन साजरा करण्याची प्रथा सुरू केली. खेड्यापाड्यात, तांडा आणि शहरातील कार्यालयात तसेच थेट धरणात कृषी दिन साजरा केला जातो. १८ ऑगस्ट १९७९ रोजी वसंतराव नाईक यांचे सिंगापूर येथे निधन झाले. त्यांचे पुतणे सुधाकरराव नाईक नंतर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले.



# महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न

आधुनिक केसरी



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

**गेल्या काही दिवसांतील महिलांवर झालेल्या अत्याचाराच्या घटना घृणास्पद, निंदनीय आहेत. समाजातील नीतीमत्ता किती खालच्या पातळीवर घसरत चाललीय याचे निदर्शक आहे. कमालीचा द्वेष, प्रेमभंगातून उफाळलेली क्रूरता, संताप अन् त्यापोटी होणारे दुष्कर्म, याची सांगड कशी लावायची हे सुज्ञाना देखील आव्हान आहे. शिक्षणाच्या निमित्ताने, नोकरी साठी तरुण मुलींना पुणे मुंबई, बंगलोर, हैदराबाद अशा शहरात एकटे राहावे लागते. अचानक मोकळेपण, घराबाहेर चे स्वातंत्र्य मिळाल्याने त्याचा गैर फायदा घेतला जातो. हे वय अल्लड असते. घसरायला वेळनाहीलागत. क्वचित तुमच्या साधे पणाचा, अज्ञानाचा, भोळेपणाचा गैर फायदा घेतला जातो. मुली भान विसरून या जाळ्यात नकळत फसतात. जेव्हा जाग येते तेव्हा वेळ निघून गेली असते.**

सोशल मीडिया, नवे तंत्रज्ञान याने जग खूप बदलले आहे. त्यातले चांगलेकाय, वाईट काय, कुठे कितीगुंतायचे, कशाला कितीमहत्त्वद्यायचे याचे अनेकांना भान नसते.यात लहान मोठे, शिक्षित, अशिक्षित सगळेआलेत.दोष पालकांचा देखील आहे. मुलावर अती कंट्रोल नको, पण एकदम दुर्लक्ष देखील नको. आजकाल पालक पाल्य यांच्यातील संवादाचे स्वरूप आरपार बदलले आहे. मुलांना प्रश्न आवडत नाहीत. जास्त टोकलेले, त्याच्या आयुष्यात ढवळा ढवळ केलेली आवडत नाही. म्हणजे मोकळे रान सोडायचे का ? आजकालचे पालकत्व पूर्वीसारखे सोपे राहिले नाही. मित्र मैत्रिणी तला मोकळेपणा वाढला आहे. या संबंधातल्या चांगल्या वाईटा च्या सीमा रेषा धूसर होत चालल्या आहेत. अगदी लहान मुलांनादेखील स्वातंत्र्य हवे आहे –मैत्रीचे, सोशल मीडियाचे, भटकंतीचे, वागण्या बोलण्याचे, कपड्या लत्त्याचे देखील ! दुसरे असे की पेशन्स राहिलेला नाही. कोणत्याही विषयाचे चांगले वाईट दूरगामी परिणाम काय होतील याचा विवेक राहिला नाही. चर्चा नको आहे. आत्मचिंतन नको आहे.मी म्हणेन तीच पूर्व दिशा असा अट्टहास वाढला आहे. मुला मुलींच्या प्रेमात पडण्यात गैर काहीच नाही. हे नवे ही नाही. पळून जाऊन लग्न करणे, दुसऱ्या जाती धर्मा त लग्न करणे, त्यापायी आपली माणसे दुखावणे, नाती गमावणे हे आजचे नाही. प्रश्न आहे ज्याला ही मुलं प्रेम म्हणतात, समजतात ते खरे प्रेम असते का ? खरे प्रेम म्हणजे निष्ठा, विश्वास, श्रध्दा,त्याग.. आज आपण जे बघतो ते असते वरवरचे तात्पुरते (शारीरिक) आकर्षण. घडी भरची गम्मत! अविवेकी संबंध.यात फक्त तरुण वेडी मुलेच फसतात असे नाही. आजकाल तर लग्न झालेले, शिकले सवरलेले स्त्री पुरुष देखील यात गुंततात. ज्यांना छोटी मुलं आहेत तेही क्षणिक मोहापोटी वाहवत जातात. या आकर्षणा मागे वेगवेगळी कारण असतात. शारीरिक आकर्षण हे एक झाले. कधी कुणाची श्रीमंती, कुणाचे मधाळ बोलणे, कुणाची प्रतिभा, कुणाची कला.. तात्पुरत्या आकर्षणाचे काहीही कारण असू शकते. तो बहारीचा, आऊटघटकेचा मौसम असतो. जसा येतो तसा जातो. डोळे उघडतात तेव्हा अब पछताये होत क्या जब चिडिया चुग गयी खेत, असे म्हणण्याची वेळ येते! घरात मुलं असताना बाहेर छीचोरे धंदे करणारे कपलसआहेतच.. त्यापैकी काहीघटस्फोट घेतात, कुणी दुसऱ्याबरोबर लिव्ह इन् रिलेशनमध्येराहतात. विशेष म्हणजेयासर्वांकडे आपल्यावागण्याचे समर्थन करण्याचे मुद्दे आहेत. धाडस आहे. कारण प्रत्येकाला स्वातंत्र्य हवे आहे. बांधील नियमाची, नीती अनीती ची चौकट नको आहे. पुनश्च ताजा घटना कडे वळू या. यात भयानक क्रौर्य आहे. निर्घृण हिंसा आहे. मानसिक आजार आहे. असुंतलन आहे.शरीरावर अत्त्याचार, बलात्कार, शरीराचे तुकडे तुकडे करणे, त्यांची विल्हेवाट लावण्यासाठी केलेले कुकर्म हे सारे सामान्य माणसाच्या समजुती पलीकडचे आहे. यातील अविचार हा टोकाचा आहे. आपण एकीकडे आपल्या पूर्वापार चालत आलेल्या संस्काराचे, वेद पुराणातील न्याय नीती चे, धर्म ग्रंथातील सद विचाराचे दाखले देतो. ढोल बडवतो. आपले तत्व ज्ञान जगमान्य होत असल्याचा दावा करतो. पण आपल्याच घरातील ही घाण, भिंतीना लागलेली खिंडारे,उघडे नागडे वास्तव.. हे सारे कसे पचवायचे ? याचे कुणाला काय स्पष्टीकरण द्यायचे ? इथे एकांगी दोष द्यायचा नाहीय. टाळी दोन्ही हातांनी वाजते हे खरे असले तरी दोषाचे पारडे पुरुष, तरुणा कडेच झुकते. हे वास्तव नाकारता येत नाही. अशा काही घटना भर दिवसा, चार चौघांसमोर घडत असताना, बघ्याची भूमिका घेणाऱ्या अवती भवती च्या समाजाची देखील कीव करावीशी वाटते! प्रत्येकाला आपला जीव प्यारा म्हणून कुणी पुढे येत नाही, मध्यस्थी करत नाही असा युक्तिवाद केला जातो.त्यातले तथ्य मानले तरी एकूणच समाजाची, मी बरा अन् माझे घर बरे ही संकुचित वृत्ती, एकूणच कायदा व्यवस्थेला आलेली मरगळ, तारीख पे तारीख देणारी न्यायाला अती विलंब लावून प्रसंगाचे गांभीर्य दुर्लक्षित करणारी न्याय व्यवस्था आपण सारेच जबाबदार आहोत. आपल्या पैकी कुणालाही या संदर्भात जबाबदारी झटकता येणार नाही. जे घडते आहे त्याला आपण सगळे एकत्र जबाबदार आहोत. माणूस शिक्षणाने सुसंस्कृत होतो असे म्हणतात. चारित्र्याची जडण घडण ही घरच्याची, पालकाची जबाबदारी समजली जाते. कायदा व्यवस्था हे सरकारचे कर्तव्य. न्याय संस्था आपले काम चोख बजावत आहे हा त्यांचा दावा! मग नेमके कोण चुकते ? का घटतात अशा घटना वारंवार ? का होतात महिलांवर अत्त्याचार, बलात्कार ? कुठे कोण कमी पडतय ? हे असेच चालायचे का ? चालू द्यायचे का ? हे सारे खरच उत्तर नसलेले, आपलीच परीक्षा पाहणारे प्रश्न आहेत का ? प्रत्येकाने गंभीर विचार करायला हवा.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# संभाजी महाराजांचे बलिदान कधीच विसरु शकत नाही

## फडणवीस : ३० हजार एकर जमीन पाण्याखाली येणार

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर हे औरंगाबादचे नाव होणे हे तुम्हाला मान्य आहे का? असा प्रश्न फडणवीसांनी मोदी @9 या कार्यक्रमातल्या लोकांना विचारला त्यांनी हो असे उत्तर दिले. त्यानंतर फडणवीस म्हणाले, छत्रपती संभाजी नगर हे नाव शरद पवारांना मान्य नाही. ते म्हणाले तुम्ही नाव काहीही करा मी औरंगाबादच म्हणणार. पवारसाहेब तुम्ही कितीही औरंगाबाद म्हटलेत तरीही छत्रपती संभाजी महाराजांना आमच्या हृदयातून कुणीही काढू शकत नाही. छत्रपती संभाजी महाराजांचे बलिदान आम्ही कधीच विसरु शकत नाही. आज वर्षपूर्तीच्या निमित्ताने या ठिकाणी आलो तेव्हा आपल्या एक भेट दिली पाहिजे असे मला वाटले. आमदार प्रशांत बंब हे एका योजनेचा पाठपुरावा करत होते. जी योजना गंगापूरचे चित्र बदलू शकते. ती म्हणजे गंगापूर सिंचन उपसा योजना. ३० हजार एकर जमीन पाण्याखाली येणार आहे. १०० टक्के पाईप आणि ड्रीपने इथल्या शेतकऱ्यांचे भाग्य बदलणार आहे. आम्ही या योजनेला कॅबिनेटमध्ये मान्यता दिली. या योजनेच्या भूमिपूजनाला दिवाळीच्या पाडव्याला येऊ असेही फडणवीस यांनी जाहीर केले. ते छत्रपती संभाजी नगर येथील गंगापूर या ठिकाणी ते बोलत होते.

एक वर्षापूर्वी आजच्या दिवशी आपल्या सगळ्यांच्या आशीर्वादाने महाराष्ट्रात परिवर्तन झाले. एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वात आपले सरकार स्थापन झाले. छत्रपती शिवरायांच्या पावलावर डोके ठेवून आणि त्यांनी दिलेल्या मार्गावर चालणारे सरकार महाराष्ट्रात आले. सरकार आल्यानंतर वेगाने कामे सुरु केली. सगळ्यात महत्त्वाचे काम आपण केले ते म्हणजे औरंगाबादचे नाव हे आपण छत्रपती संभाजी नगर असे आपण केले, असे वक्तव्य देवेंद्र फडणवीस यांनी केले. प्रशांत बंब यांच्या पाठ पुराव्यामुळे ही योजना या ठिकाणी येऊ शकते आहे. सरकार कसे गतिमान आहे बघा. मागच्या म्हणजे उद्धवजींच्या सरकारमध्ये एकाही योजनेला फेरप्रशासकीय योजनेला मान्यता अडीच वर्षांत दिली नाही. आम्ही एका वर्षात ३५ योजनांना मान्यता दिली. साडेआठ लाख हेक्टर जमीन ओलिताखाली येईल इतक्या योजनांना मान्यता दिली आहे. रत्नापूर तालुक्यासाठीही निधी आम्ही देणार आहोत. मराठवाड्याला दुष्काळापासून मुक्ती देणे हे आमचे उद्दीष्ट आहे. आम्हाला इथे परिवर्तन घडवायचे आहे. मला विश्वास आहे की हे परिवर्तन आपण करुन दाखवू. मोदीजींच्या बरोबर डबल इंजिन सरकार आहे. एकमेकांना सोबत घेऊन चालणारे डबल इंजिन महाराष्ट्रालाही पुढे घेऊन जातील असाही विश्वास देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. मोदींच्या नेतृत्वात भारतात लोकशाही जिवंत आहेच आणि ती समृद्ध होते आहे, असे अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनीही सांगितले आहे. मोदींचे सगळे विरोधक पाटण्याला एकत्र आले होते. पण मला सांगा यांच्याकडे एक नेता आहे का? जो मोदींच्या तोडीचा आहे? तुम्हाला सहा महिने राज्य देतो तुम्ही एक नेता ठरवून दाखवा. असेही आव्हान फडणवीस यांनी दिले. या देशात एकच नेता आहे ते म्हणजे नरेंद्र मोदी असेही फडणवीस यांनी म्हटले आहे.

# कृषी संजीवनी सप्ताहनिमित्त कृषी प्रक्रिया तंत्रज्ञान प्रसारदिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगांव :** तालुक्यातील पोहरी बु. येथे सोयगाव कृषी विभागाच्या वतीने कृषि संजीवनी सप्ताह कार्यक्रमा अंतर्गत कृषि विभाग व आत्मा यंत्रणा यांचे मार्फत मार्गदर्शन करण्यात आले.

आजच्या कार्यक्रमात प्रदिप पाटील कृषि पर्यवेक्षक बनोटी-१ यांनी कृषि प्रक्रीया तंत्रज्ञान याविषयी मार्गदर्शन केले. किशोर महाजन कृ.प.बनोटी - 2 यांनी , महाडीबीटी योजना, ठिबक सिंचन योजना याविषयी मार्गदर्शन केले. अमोल महाजन बी. टी. एम. सोयगांव यांनी आत्मा योजना, गट संघटन तसेच प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना याविषयी माहिती दिली. विजय निकुंभ कृषि सहाय्यक उप्पलखेडा यांनी गोपीनाथ मुंडे सानुग्रह योजना, पिक विमा योजना, पीएम किसान योजना याविषयी माहिती दिली. कैलास कुमावत कृषि सहाय्यक यांनी महाडीबीटी योजना, एम. आर. ई. जी. एस. योजना याविषयी मार्गदर्शन केले.याप्रसंगी कार्यक्रमास गावचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, प्रगतिशील शेतकरी व महिला शेतकरी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



# संतोष पवार यांची शिवसेना वैद्यकीय कक्षात सहायक वैद्यकीयपदी निवड

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** येथील समाजसेवक संतोष पवार यांची शिवसेना वैदयकीय कक्षात साहयक वैदयकीय पदी निवड करण्यात आले. गोरगरीब दुर्बल काही दुर्घटना घडली तर जखमीना मदत करण्यासाठी मोठ्या समस्याला सामोरे जावे लागते म्हणून



शिवसेना यांनी वैदयकीय सेवा सुरू केली. रुग्णांना योग्य तसेच मोफत उपचार मदत मिळावी म्हणून संतोष पवार यांची निवड करण्यात आली.

अर्जंट पाहिजेत
बँक ऑफिससाठी महिला (कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक), अनुभवी सुपरवायजर, मार्केटिंग प्रतिनीधी (स्वत:ची टू-व्हीलर आवश्यक) आणि अनुभवी सेक्युरिटी गार्ड पाहिजे.
संपर्क - 9822982958

# पत्नीला जिवंत जाळणाऱ्यास जन्मठेप

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** किरकोळ भांडणात पत्नीच्या अंगावर केरोसिन ओतून तिला जिवंत जाळले. यावेळी पतीच्या आईनेही सुनेला जाळण्यास प्रोत्साहित केले. या घटनेत पत्नी गंभीर भाजली आणि तिचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. आठ वर्षांनंतर या घटनेचा निकाल लागला आणि न्यायालयाने आरोपी पतीस जन्मठेपेची शिक्षा सुनावली. हा निकाल प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश शिशिरकुमार हांडे यांनी बुधवारी दिला. प्रशांत कृष्णराव लुटे (३५, रा. फ्रुट मार्केट,यवतमाळ), असे जन्मठेपेची शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे. अश्वीनी प्रशांत लुटे, असे मृत विवाहितेचे नाव आहे. तिचा विवाह २ मे २०१४ रोजी प्रशांतसोबत झाला होता. पती, सासू व नणंद त्रास देत असल्याने अश्वीनीने महिला व बाल विकास संस्था, नागपूर यांच्याकडे तक्रार दिली होती. दरम्यान ६ एप्रिल २०१६ रोजी तिला जिवंत जाळण्यात आल्याचा आरोप अश्वीनीच्या नातेवाईकांनी केला. तिला उपचारासाठी वैद्यकीय रुग्णालयात भरती करण्यात आले. तिची मृत्यूपूर्वी जबानी कार्यकारी दंडाधिकारी यांच्या समक्ष डॉक्टरांच्या उपस्थितीत झाली.

# मणिपुरात राष्ट्रपती राजवट लागू करा : नसीम खान

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मणिपूरमध्ये दोन महिन्यापासून हिंसाचार सुरु असून देशाचे पंतप्रधान या गंभीर समस्येवर गप्प बसून आहेत हे चिंताजनक आहे. हिंसाचारग्रस्त मणिपूर राज्यात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी भेटी दिली तरीही तेथे शांतता आणि सामाजिक सौहार्दाला चालना मिळाली नाही. मणिपूरमधील हिंसाचार आणि द्वेष तात्काळ थांबवण्यासाठी राज्य सरकार बरखास्त करुन राष्ट्रपती राजवट लागू करावी, अशी मागणी माजी मंत्री व प्रदेश काँग्रेसचे कार्याध्यक्ष नसीम खान यांनी केली आहे.

माजी मंत्री नसीम खान यांच्या नेतृत्वाखाली अल्पसंख्याक गट, ख्रिश्चन संघटना आणि आदिवासी नेते यांनी राजभवन येथे राज्यपाल रमेश बैस यांची भेट घेऊन मणिपूर प्रश्नावर महामहिम राष्ट्रपती यांच्यासाठीचे निवेदन सादर केले. या निवदेनात असे म्हटले आहे की, जवळपास दोन महिन्यांहून अधिक काळ आम्ही मणिपूरमध्ये एक मोठी मानवी शोकांतिका घडताना पाहिली आहे. वांशिक गटांमधील अभूतपूर्व हिंसाचाराने मणिपूरमधील लोकांचे जीवन उद्‌ध्वस्त केले आहे आणि घरे उखडून टाकली आहेत, त्यांना त्यांची जागा सोडण्यास भाग पाडले जात आहे. लोक त्रस्त असून जीव मुठीत घेऊन जगत आहेत. राज्यात इंटरनेट सेवा पूर्णपणे बंद करण्यात आली आहे. आपलेच लोक एकमेकांच्या विरोधात गेल्याचे पाहून खूप वेदना होत आहेत. मणिपूरमध्ये अनेक दशकांपासून सर्व जाती धर्मांचे लोक एकत्र रहात आहेत पण दोन महिन्यातील हिंसाचारात २०० हून अधिक प्रार्थनास्थळे उद्‌ध्वस्त झाली आहेत. १२ हजारांपेक्षा लोक विस्थापित झाले आहेत.

महाराष्ट्र Business Katta












# लेखक एकनाथ रेंदाळकर जयंती स्मरण लेख



प्रज्ञा पंडित, ठाणे
संपर्क क्र. 9320441116

आधुनिक केसरी

**वाचन,लेखन, मनन, चिंतन ही निरोगी मनासाठी आवश्यक अशी चौसुत्री आहे. प्रत्येकाने आपापल्या रूचीनुसार सतत काही ना काही वाचत राहावे. वाचन आपल्याला समृद्ध करते. मनुष्याची हीच मानसिक गरज लक्षात घेऊन प्रत्येक भाषेतील साहित्यात अमाप लेखन महान लेखकांनी केलेले आहे. त्यातील अनेक विषयांवरील लेखन हे कालातीत आहे. एक सुजाण वाचक म्हणून अशा लेखकांचे योगदान समजून घेणे आवश्यक ठरते. काळाच्या ओघात अशा लेखकांची नावे मागे जाऊ नयेत, ती कायम स्मृतीत रहावीत यासाठी त्यांची ओळख प्रत्येक पिढीला होणे गरजेचे आहे.**

आजच्या ह्या लेखात आपण अशीच एक ओळख करून घेणार आहोत, लेखक एकनाथ पांडुरंग रेंदाळकर यांची! त्यांचे टोपणनाव होते, मंदार! दिनांक १ जुलै, इ.स. १८८७ रोजी रेंदाळ येथे त्यांचा जन्म झाला. त्यांचे संपूर्ण बालपण रेंदाळ आणि कुरुंदवाड येथे गेले. रेंदाळ येथे केवळ प्राथमिक शिक्षणापर्यंतचीच सोय त्या काळी असल्याने चौथीनंतरचे शिक्षण घेण्यासाठी रेंदाळकर कागलला गेले. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर अजून पुढे संस्कृत शिकण्यासाठी ते सांगलीत आले. तेथे ते संस्कृत पाठशाळेत जाऊ लागले. १९०९ च्या सुमारास रेंदाळकर कोल्हापूरला आले. तेथे त्यांनी दोन वर्षे सिद्धान्त कौमुदीचे अध्ययन केले. कागल येथे रेंदाळकरांचे वास्तव्य असतानाच्याच काळात त्यांचे वडील गेले. १९०५ मध्ये रेंदाळकरांनी बेळगाव जिल्ह्यातील कुन्नूर या गावी ते शिक्षक म्हणून कार्यरत होते. कोल्हापुरात त्या काळी 'विजयी मराठा' हे साप्ताहिक निघत असे. याच साप्ताहिकात रेंदाळकरांच्या सुरुवातीच्या काळातील कविता प्रसिद्ध झाल्या. मात्र, 'मंदार' या टोपणनावाने त्या प्रसिद्ध होत असत. रेंदाळकरांना बंगाली भाषा उतम येत होती. त्यांनी तरुलता मुझुमदार, मधुसूदन मायकेल दत्त या बंगाली कवींच्या कवितांचे मराठी रूपांतर केले आहे. बंगालीबरोबरच काही संस्कृत, इंग्रजी व गुजराती काव्यरचनाही त्यांनी मराठीत आणल्या. इ.स. १९०८ साली 'वरिवरी जळे बाळे! डोळे अहा भरले किती!' ही रेंदाळकरांची अगदी पहिली कविता 'केरळ कोकिळा'मध्ये प्रसिद्ध झाली. या मासिकाचे विख्यात संपादक कृष्णाजी नारायण आठवले हे चोखंदळ व चिकित्सक म्हणूनच प्रसिद्ध होते.

कोल्हापुरातील जगद्‌गुरू मठातर्फे 'धर्मविचार' हे मासिक सुरू झाले. रेंदाळकर त्याचे सहसंपादक झाले. हे काम एकीकडे सुरू



असताना त्यात रेंदाळकरांचे कवितालेखनही जोमात होते. याच काळात 'मंदारमंजरी' या शीर्षकाने १९१० रोजी रेंदाळकरांनी निवडक कवितांचा संग्रह प्रसिद्ध झाला. 'सुधारक', 'विविधज्ञानविस्तार', 'मनोरंजन', 'प्रगती' इत्यादी त्या वेळच्या नियतकालिकांत या पुस्तकाची प्रशंसापर परीक्षणे प्रसिद्ध झाली. 'मंदारमंजरी'मुळे महाराष्ट्रातील मान्यवर कवींमध्ये त्यांची गणना होऊ लागली. रेंदाळकरांनी आंग्ल कवी टेनिसनच्या 'एनॉक आर्डन' या काव्याचे 'सारजा' ह्या नावाने मराठीत रूपांतर केले. रेंदाळकरांचे प्रकाशित काव्यसंग्रह :
अन्योक्तिमुक्तांजलि ( दोन भाग, १९११;१९१५ )
मंदारमंजरी ( १९१० ) बुद्धिनीति ( १९१६ )

मोहिनी ( खंडकाव्य, १९१३ ) यमुनागीत ( दीर्घकाव्य ) विरहिणी राधा ( १९१६ ) सारजा ( दीर्घकाव्य ) रेंदाळ गावाचे कुलकर्णीपण रेंदाळकरांच्या वाडवडिलांकडे होते. सुरुवातीच्या काळातील रेंदाळकरांच्या कवितांवर रेंदाळकर या आडनावाऐवजी कुलकर्णी असे आडनाव आढळते, त्याचे कारण हेच होय. रेंदाळकर सहसंपादक असलेल्या 'धर्मविचार'चे प्रकाशन १९१२ मध्ये एका वर्षापुरते स्थगित झाले. त्यानंतर रेंदाळकर मुंबईहून प्रसिद्ध होणाऱ्या 'मासिक मनोरंजन'मध्ये साहाय्यक संपादक म्हणूम रुजू झाले. तेथे आधीच पदावर असलेल्या विठ्ठल सीताराम ऊर्फ वि.सी. गुर्जर यांच्याबरोबरच 'मनोरंजन'वर रेंदाळकरांचेही नाव झळकू लागले. गुर्जर यांचे ते साहाय्यक होते.'मनोरंजन'शिवाय 'करमणूक', विविधज्ञानविस्तार' येथेही निरनिराळ्या काळी रेंदाळकर संपादक म्हणून काम करत होते. 22 नोव्हेंबर 1920 रोजी त्यांच्या मूळ गावीच रेंदाळ येथे त्यांचे निधन झाले.

रेंदाळकरांचे सांगलीतील वास्तव्य वामन जनार्दन कुंटे यांच्या वाड्यात होते. पुढे कुंटे त्यांचे गाढ स्नेही झाले. रेंदाळकरांच्या मृत्यूनंतर त्यांच्या कवितांचे दोन खंड कुंटे यांनी प्रसिद्ध केले. कुंटे यांच्यामुळेच रेंदाळकरांच्या कविता महाराष्ट्रापुढे आल्या. या कविता रेंदाळकरांची कविता' ( दोन भाग, १९२४; १९२८ ) ह्या नावाने संकलित करण्यात आल्या आहेत.

# कृषी दिवस



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२१५

आधुनिक केसरी

**आज हरितक्रांतीचे प्रणेते, महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री स्वर्गीय वसंतराव नाईक यांचा जन्मदिन. त्यांच्या जन्मदिनानिमीत्त आजचा दिवस म्हणजे १ जुलै हा दिवस संपूर्ण राज्यात कृषी दिन म्हणून साजरा केला जातो. त्यांच्यामुळेच देशात हरितक्रांती होऊ शकली.**



वसंतरावांच्या याच योगदानाची आठवण म्हणून महाराष्ट्र सरकारने १ जुलै हा दिवस कृषी दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. राज्यभर हा दिवस वेगवेगळ्या उपक्रमांनी साजरा केला जातो. शेती ही फार पुरातन काळापासून चालत आली आहे. शेती हाच आपला मुख्य व्यवसाय आहे. देशातील सत्तर टक्के लोक शेतीच करतात. राज्यात शिवाजी महाराजांच्या काळात शेतकऱ्याला खूप महत्वाचे स्थान होते. दिवाळीच्या सणाला प्रत्येक घरात शेतकऱ्यांसाठी प्रार्थना केली जायची. ईडा पीडा टळो आणि बळीचे राज्य येवो असा आवाज घराघरांतून ऐकू यायचा. हा आवाज आता कुठे तरी लुप्त होऊ लागला आहे. अनेक सामस्यांनी ग्रासलेल्या शेती आणि शेतकऱ्यांसाठीचा हा आवाज पुन्हा कसा घुमेल यासाठी आजच्या कृषिदिनापासूनच प्रयत्न करायला हवेत. आज शेतीची आणि शेतकऱ्यांची अवस्था दयनीय आहे. आस्मानी आणि सुलतानी संकटांनी बळीराजा पिचला आहे. शेतकरी हा शब्द बोलायला जेवढा सोप्पा आहे तेवढा सोप्पा नाही. शेती करताना अचानक येणाऱ्या संकटांचा सामना शेतकऱ्यांना करावा लागतो. त्यात बेमोसमी पाऊस, ओला दुष्काळ, कोरडा दुष्काळ, गारपीट, बाजारपेठेतील बाजारभावात होणारी घसरण, शेतीसाठी सावकाराकडून किंवा बँक, पतसंस्था इत्यादींकडून घेतलेले कर्ज परतफेडीची मुदत, निर्यातीत होणारे शासकीय बदल या व अशा सर्व संकटाला शेतकरी सामोरे जात असतो. हवामानात अचानक होणाऱ्या बदलांमुळे शेतीतील पिकांचे नुकसान होते. हजारो - लाखो रुपये खर्च करून शेतकरी आपला शेतीमाल तयार करतो. त्याची काळजी घेतो. पण त्याला त्याच्या कष्टाचे फळ मिळतेच असे नाही. कधी आस्मानी तर कधी सुलतानी संकटांनी बळीराजाचा हातचा घास हिरावला जातो. शासन दरबारीही त्याची दखल घेतली जात नाही. कर्जाच्या बोझ्याखाली अडकून बळीराजा आत्महत्या करतो. महाराष्ट्रासारख्या कृषिप्रधान राज्यात सर्वाधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. शेतकऱ्यांना कोणी वाली नाही अशी भावना शेतकऱ्यांची झाली आहे. हे चित्र बदलायला हवे. पुन्हा एकदा इडा पीडा टळो बळीचे राज्य येवो हा आवाज घराघरातून घुमायला हवा यासाठी आजच्या कृषिदिनापासून प्रयत्न करायला हवेत. आजच्या कृषी दिवसाच्या निमित्ताने तमाम शेतकरी बांधवांना कृषिदिनाच्या शुभेच्छा!

# वेनलॉक क्रीडास्पर्धा



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**दि.२३ जून १८९४ रोजी आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समितीची स्थापना झाली. त्या दिवसाच्या स्मरणार्थ आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक दिवस साजरा केला जातो. जगभरातील खेळाडूंना सर्वोत्कृष्ट बनण्यास प्रवृत्त करणे हा आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक दिवस साजरा करण्याचा हेतू आहे. पहिला आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक दिवस २३ जून १९४८ला साजरा करण्यात आला. ऑलिंपिकमध्ये विजय मिळवणं नाही, तर सहभाग घेणं सर्वांत महत्त्वाचं आहे, आयुष्यात जिंकणं नाही, तर लढणं सर्वांत महत्त्वाचं आहे. आधुनिक ऑलिंपिकचे जनक मानले जाणाऱ्या पिएर द कुबेर्तान यांच्या त्या विधानात खेळांचेच नाही, तर जगण्याचे सूत्रही सामावले आहे.**

कुबेर्तान यांच्या प्रयत्नांतूनच दि.२३ जून १८९४ रोजी आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समिती- आइओसीची स्थापना झाली होती. त्यामुळेच २३ जून हा दिवस दरवर्षी ऑलिंपिक डे म्हणून साजरा केला जातो. ऑलिंपिक ही केवळ एक क्रीडास्पर्धा नाही, तर खेळाचा प्रसार करणारी आणि त्यातून लोकांना एकत्र आणणारी एक मोठी विश्वव्यापी चळवळ आहे. ऑलिंपिक चळवळीचे हे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी वर्षातला एक दिवस ऑलिंपिक दिवस म्हणून साजरा केला जावा, असा प्रस्ताव पहिल्यांदा सन १९४७ साली मांडण्यात आला होता. अनेक आजी माजी ऑलिंपियन खेळाडूंनी या काळात लोकांना प्रेरणा दिली आहे, खेळाने लोकांच्या जगण्यात सकारात्मकता आणली आहे आणि शारिरीक तसेच मानसिक स्वास्थ्य टिकवून ठेवण्यासाठीही मदत केली आहे, असे विश्व ऑलिंपिक समितीने नमूद केले होते. जगाला एकत्र आणणाऱ्या सोहळ्याची ही सुरुवात होती. ऑलिंपिक समितीची स्थापना सव्वाशे वर्षांपूर्वी झाली होती, परंतु त्याचा इतिहास बराच जुना आहे. प्राचीन ग्रीसमध्ये इसवीसनपूर्व आठव्या शतकात म्हणजे सुमारे दोन हजार सातशे वर्षांपूर्वी या क्रीडास्पर्धांची सुरुवात झाली होती. सुमारे पन्नास हजार जण त्या खेळांसाठी हजेरी लावायचे, असे उल्लेख इतिहासात आहेत. ग्रीक संस्कृतीत खेळांना व खेळाच्या स्पर्धांना महत्त्वाचे स्थान होते आणि दर चार वर्षांनी होणारा ऑलिंपिक हा सर्वात मोठा सोहळा होता, अगदी आजच्यासारखाच! परंतु ग्रीकांसाठी हाच एक धार्मिक उत्सवही होता. ग्रीक संस्कृतीत झ्यूस हा देवांचा राजा मानला जायचा. त्याच्या सन्मानार्थ ऑलिम्पिया येथे या खेळांचे आयोजन केले जायचे. येथेच झ्यूसचे मंदिर होते आणि त्यात त्याची सोने आणि हस्तिदंताने मढवलेली मूर्ती होती. तेथे धार्मिक विधीही होत असत, प्राण्यांचा बळी देण्याचीही प्रथा होती. काहीसे आपल्याकडच्या यात्रांमधल्या कुस्ती, कबड्डीच्या स्पर्धांसारखेच म्हणा ना! फरक इतकाच की त्या काळी विजेत्यांना पदक किंवा पैसे नाही, तर ऑलिव्हच्या फांदीपासून तयार केलेला मुकुट दिला जायचा आणि ते त्यांच्या गावी परतल्यावर मोठा मानसन्मान मिळायचा. खेळाडू आपल्या नगरराज्याची शान राखण्यासाठी खेळायला उतरायचे.

जागतिक ऑलिंपिक समितीतील झेकोस्लोवाकियाचे प्रतिनिधी डॉक्टर ग्रुस यांनी मांडलेली ही संकल्पना सर्वांनीच पुढे उचलून धरली आणि काही महिन्यांनी तिला मूर्त रूपही मिळाले. तेव्हापासून या दिवशी किंवा त्याच्या आसपासच्या एखाद्या सोयीस्कर दिवशी वेगवेगळ्या देशांतल्या राष्ट्रीय ऑलिंपिक समितींतर्फे त्या त्या देशात ऑलिंपिक दिनाचे आयोजन केले जाते. त्यानिमित्ताने खेळ आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन होत असते. वय, वर्ण, लिंग, सामाजिक पार्श्वभूमी काहीही असो, सगळ्यांनाच म्हणजे अगदी अजिबात कोणताही खेळ न खेळणाऱ्या व्यक्तींनाही यात सहभाग घेता यावा, ही अपेक्षा ठेवली जाते. काही देशांत तर ऑलिंपिक डे हा शाळेतील महत्त्वाचा सोहळा बनला आहे. एकीकडे कोव्हिड-१९च्या जागतिक साथीने सगळीकडे निराशेचे सावट पसरलेले असताना तर ऑलिंपिक दिवसाचे महत्त्व आणखी वाढते. एकमेकांत गुंफलेल्या पाच रिंगा हे ऑलिंपिकचे बोधचिन्ह आहे. याला ऑलिंपिक रिंग्स म्हटले जाते. जगभरातल्या अब्जावधी लोकांचे प्रतिनिधीत्व या रिंगा करतात. ऑलिंपिकचे जनक मानले जाणाऱ्या पिएर द कुबेर्तान यांनी पहिल्यांदा हा लोगो तयार केला. पाच खंडांचे द्योतक असणाऱ्या या रिंगा विविध रंगांच्या, पण समान आकाराच्या आणि एकमेकांमध्ये गुंफलेल्या आहेत. जगभरातील लोकांचे एकत्र येणे यावरून दर्शित होते. पांढऱ्या पार्श्वभूमीवरील या रिंगा निळा, पिवळा, काळा, हिरवा आणि लाल अशा रंगात असतात. दोराबजी टाटांनी भारतीय खेळाडूंना स्वतःच्या पैशाने ऑलिम्पिकला पाठवले होते. याचे कारण असे, की म्युनिक ऑलिम्पिकमधली ती रक्तरंजित रात्र, जेव्हा अकरा इस्रायली खेळाडूंची हत्या झाली होती... एरवी या नगरराज्यांमध्ये युद्धं, लढाया, भांडणं व्हायची. पण ऑलिंपिकच्या काळात पवित्र युद्धबंदी लागू केली जात होती. खेळाडू आणि प्रेक्षक ऑलिम्पियाला जाऊन सुखरूपपणे परत येऊ शकतील, यासाठी ही युद्धबंदी व्हायची. ऑलिंपिक स्पर्धा हे तेव्हापासूनच शांतीचे प्रतीक मानले जाते. पूर्वी ऑलिम्पियातील हे खेळ पाहण्यासाठी फक्त पुरुष, लहान मुलं आणि अविवाहित मुलींनाच परवानगी होती, लग्न झालेल्या स्त्रियांना तिथे जाण्यास मज्जाव होता. नियम मोडणाऱ्यांना कडेलोट करण्याची शिक्षा होत असे. पण महिला आपल्या मालकीचे घोडे या ऑलिंपिकमध्ये रथांच्या स्पर्धेत उतरवू शकत होत्या. तसेच दर चार वर्षांनी झ्यूसची पत्नी हेराच्या सन्मानार्थ केवळ अविवाहीत महिलांच्या खेळाचे आयोजन केले जायचे. ग्रीक संस्कृतीचा प्रभाव ओसरत गेला, तसे हे खेळ मागे पडत गेले आणि काहींना त्यांचा साफ विसर पडला होता.




आधुनिक ऑलिंपिकचे जनक फ्रेंच जहागीरदार पिएर द कुबेर्तान यांना आधुनिक ऑलिम्पिकच्या आयोजनाचे श्रेय दिले जाते. परंतु त्यासाठी त्यांना प्रेरणा मिळाली होती, ती इंग्लंडमधील वेनलॉक ऑलिंपिक गेम्समधून. मच वेनलॉक गावी जन्मलेले डॉ.विल्यम पेनी ब्रुक्स यांनी आपल्या परिसरातील तरुणांना शिस्त लागावी, त्यांची तब्येत सुधारावी अशा उद्देशाने सन १८५० साली वेनलॉक ऑलिंपिक गेम्सची सुरुवात केली होती. या वेनलॉक क्रीडास्पर्धांमधूनच पिएर द कुबेर्तान यांना आधुनिक ऑलिंपिक खेळांच्या आयोजनाची प्रेरणा मिळाली होती. कुबेर्तान हे शिक्षणतज्ज्ञ होते, ते श्रीमंतही होते. ते इंग्लंडमधील शाळांच्या कामाच्या पद्धतीवर संशोधन करण्यासाठी गेले असताना त्यांना तेथे- खेळावर कसा भर दिला जातो ? खेळातून मूल्यशिक्षण देता येते का ? आणि समाजाविषयी जागरुकता कशी निर्माण करता येते ? याची प्रकर्षाने जाणीव झाली. त्यांचे फ्रान्समधल्या शाळांमध्ये क्रीडासंस्कृती रुजवण्याचे प्रयत्न तेवढे यशस्वी झाले नाहीत. मात्र त्या सगळ्यांतून त्यांना प्राचीन ऑलिंपिकचे पुनरुज्जीवन करण्याची प्रेरणा मिळाली. त्यांच्या कल्पनेतल्या या ऑलिम्पिकमध्ये देशविदेशातले खेळाडू सहभागी होणार होते आणि आपापसातील वैर विसरून खेळाच्या मैदानात उतरणार होते. कुबेर्तान यांच्या प्रयत्नांतून फ्रान्समध्ये सन १८९४ साली २३ जून या दिवशी आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समितीची स्थापना झाली. दोनच वर्षांत ग्रीसची राजधानी अथेन्समध्ये पहिल्या आधुनिक ऑलिंपिक क्रीडास्पर्धांचे आयोजन करण्यात आले. एप्रिल १८९६मध्ये अथेन्सच्या पॅनाथेनिक स्टेडियममध्ये पहिल्या आधुनिक ऑलिंपिक खेळांचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी त्रेचाळीस क्रीडाप्रकारांमध्ये फक्त चौदा देशांचे जेमतेम दोनशे पुरुष खेळाडू सहभागी झाले होते. त्यात टेनिस, ट्रॅक अँड फिल्ड, फेन्सिंग, वेटलिफ्टिंग, सायकलिंग, कुस्ती, नेमबाजी, जलतरण आणि जिमनॅस्टिक्स यांचा समावेश होता. क्रिकेट आणि फुटबॉललाही त्या स्पर्धेत स्थान मिळाले होते, परंतु पुरेशा खेळाडूंअभावी ते रद्द करावे लागले होते. चार वर्षांनी दुसऱ्या ऑलिंपिकमध्ये काही खेळांत पहिल्यांदाच महिलांना स्थान मिळाले. त्यानंतर पुढच्या सव्वाशे वर्षांत या क्रीडास्पर्धेने बरेच चढउतार पाहिले आहेत. लोकांना खेळावर प्रेम करायला शिकवले आहे आणि त्यांना संकटकाळात प्रेरणा पण दिली आहे. ऑलिंपिक दर चार वर्षांनी का होते ? तर प्राचीन काळी ग्रीसमधील ऑलिम्पिया नगरीमध्ये दर चार वर्षांनी खेळ म्हणजेच ऑलिंपिक होत असे. म्हणून हीच परंपरा पुढे सुरू ठेवण्यात आली. दोन ऑलिंपिकदरम्यानच्या चार वर्षांच्या काळाला ऑलिम्पियाड म्हटलं जाई आणि हे त्याकाळी कालगणनेचे मापही होते. म्हणजे वर्षांऐवजी ऑलिम्पियाडमध्ये कालगणना केली जाई.

सन १९०० साली पॅरिसमध्ये झालेल्या ऑलिंपिकमध्ये महिला पहिल्यांदा सहभागी झाल्या. हे दुसरेच ऑलिंपिक होते. त्यात सहभागी झालेल्या ९९७ ॲथलीट्सपैकी २२ महिला होत्या. टेनिस, सेलिंग, क्रोके, इक्वेस्ट्रियानिझम- घोडेस्वारीशी निगडीत स्पर्धा आणि गोल्फ या खेळ प्रकारांत महिला ॲथलीट्स सहभागी झाल्या. सन २०१२मध्ये लंडन ऑलिंपिकमध्ये महिलांच्या बॉक्सिंगचाही समावेश झाला, तेव्हापासून ऑलिंपिकच्या सर्व क्रीडा प्रकारांत महिलांचा समावेश झाला. सन १९९१पासून यांत नवीन खेळाचा समावेश करण्यासाठी एक नियम करण्यात आला. महिला आणि पुरुष अशा दोन्ही ॲथलीट्सचा सहभाग ज्या खेळात असेल, तोच ऑलिंपिकमध्ये समाविष्ट केला जाऊ शकतो. यानंतर टोकियो २०२० ऑलिंपिकमध्ये कराटे, स्केटबोर्डिंग, सर्फिंग, क्लाईंबिंग या खेळांचा पहिल्यांदाच समावेश करण्यात आलाय. सन २०१६च्या रिओ ऑलिंपिकमध्ये सहभागी झालेल्या स्पर्धकांपैकी ४५ टक्के महिला होत्या, हे येथे उल्लेखनीयच!

# जगाचा पोशिंदा



संगीता ठलाल
७८२१८१६४८५

आधुनिक केसरी

**आज १ जुलै शेतकरी दिन त्या निमित्ताने सर्व शेतकरी बंधू, भगिणींना शेतकरी दिनाच्या मनपूर्वक हार्दिक शुभेच्छा एका अर्थाने बघायला गेले तर बळीराजावर बोलणं फार सोपं आहे, त्याच्यावर लिहिणं अजून सोपं आहे पण, खास करून त्याला वाचणे व समजून घेणे फार कठीण काम आहे. त्यासाठी एकदातरी त्या बळीराजासारखे एकतरी दिवस जगून बघावे लागते तेव्हाच, बळीराजा कळत असतो. नुसते बोलण्याने किंवा लिहिण्याने त्याच्यात असलेली महानता कळत नाही हे सुद्धा तेवढेच सत्य आहे. बळीराजा हा जगाचा पोशिंदा महापुरुष आहे. सारा विश्व त्याला चांगल्याप्रकारे जाणतो आहे कारण, त्याच्यात तेवढी महानता आहे तो, सर्वगुणसंपन्न आहे आणि खास करून जगवता आहे.**

पण, आजच्या घडीला बघितले तर त्याचाच बळी घेतला जात आहे मग राजा तरी कसा म्हणावे..? आज त्याला ह्या, निसर्गाने, महा महागाईने, व त्याच्या मालाला पाहिजे तो भान न मिळाल्यामुळे आज तो भिकारी झाला आहे. राजाला तर सारी प्रजा घाबरत असते व त्याचा सन्मान करत असते जर एखाद्या वेळी राजावर संकट आले तर.. त्याच्या मदतीला सारी प्रजा धावून येत असते मग बळीराजा सुध्दा एक राजाच आहे, सर्वात श्रेष्ठ आहे मग त्याच्यावर जेव्हा वेळ येते तेव्हा का बरं त्याची मदत करण्यासाठी कोणी धावून येत नाही... ? फक्त, पोशिंदाच म्हटले की झालं असच आज दिसून येत आहे. बळीराजावर आलेले संकटे त्याचे जीव घेत आहेत तो गळफास घेऊन आत्महत्या करत आहे शोकांतिका म्हणावे लागेल की, अशा घटना घडत असताना कोणालाही दिसत नाही आणि दिसते पण, काळजीपूर्वक लक्ष दिल्या जात नाही. बळीराजा स्वतः साठी कधी जगतच नाही कारण, स्वार्थी होऊन जगणे त्याला अजिबात आवडत नाही पण दुसऱ्यांसाठी धावून जायला व त्यांना पोसायला मात्र तो मागे पुढे बघत नाही तरीही आज त्याच्या मालाला भाव विचारतात ही कसली माणुसकी...? जे, स्वतः रूपयाची कोणाला मदत करत नाही ते भिकारी होऊन बळीराजाच्या शेतावर जाऊन भाजीपाला फुकटात मागून आणतात आणि वेतनवाढी साठी आंदोलन करतात काय म्हणावे अशा विचारसरणीला आज बघायला गेले तर... बळीराजा किती संकटात सापडला आहे हे जाणून घेणे समाजातील प्रत्येक माणसांचे आद्य कर्तव्य आहे. आज बळीराजा शेतावर गेलाच नाही कारण पावसाचा पत्ताच दिसत नाही तो किती चिंतेत सापडला असेल हे जाणून घेण्यासाठी कोणी वेळ काढत नाही. मग सांगा बळीराजाला आधार तरी कोणाचा आहे...?

आज सर्वांनी मिळून त्याच्याकडे पाठ फिरवली आहेच पण निसर्गानेही जमून पाठ फिरवली आहे. जेव्हा त्याची गरज नसते तेव्हा धोधो पडत असतो आणि सारा पीक सडून जाईपर्यंत जायचं नाव घेत नाही आणि जेव्हा त्याची गरज असते तेव्हा मात्र डोळे वटारून परीक्षा घेत असतो खरंच सांगा इथे बळीराजाचा काय दोष आहे..? जेव्हा, जेव्हा बळीराजाच्या जीवनात संकटे येतात तेव्हा सर्वांना सुखाची झोप लागत असते हे कसं काय होऊ शकते...? आज जगाला पोसणारा पोशिंदा संकटात असताना पाहून झोप लागणे म्हणजे कुठेतरी त्याचा विसर पडणे होय, असं म्हणायला काहीच हरकत



नाही म्हणूनच तर..आज त्याच्यासाठी कोणी पुढाकार घेत नाही, आपुलकीने मदत करत नाही, त्याला न्याय मिळवून देण्यासाठी कोणी ताकदीने झटत नाही त्यामुळे बळीराजाचा विकास होत नाही आजही तो तिथेच आहे आणि समोरही तिथेच राहणार आहे कारण त्याचा वाली दिसत नाही कदाचित त्या वालीला जन्म घ्यावा लागेल. साऱ्या लोकांच्या जीवनातील संकटे संपतात पण बळीराजाच्या जीवनातील संकटे कधीच संपत नाही तो, मेला किंवा वाचला त्याच्याशी कोणाचं देणं, घेणं नाही आपला विचार करतात भरभरून वेतन असुन सुध्दा बळीराजाचे असोत किंवा गोर, गरीबांचे काम करायचे असतील तर लाच घेतात अशा भिकारी लोकांच्या वेतनात पुन्हा वाढ होत असते देशाला भिकारी करून सोडले आहेत अशाच लोकांची आजकाल शासनाला सुद्धा गरज आहे. पण, जो जगाला पोसणारा महापुरुष आहे त्याची मात्र पाहिजे तेवढ्या प्रमाणात दखल घेतली जात नाही त्याच्या उच्च शिक्षित असलेला मुलगा आज बेरोजगार आहे हे दुर्दैव म्हणावे लागेल. चला एकदा तरी या महापुरुषाला वाचविण्यासाठी पुढाकार घ्या तो वाचेल तर जगाला पोसू शकेल नाही तर हातात मुठभर पैसे असून सुद्धा कोणी पैसे खाऊन जगणार नाही. कारण जीवन जगतेवेळी पैशाची गरज तर असतेच पण त्यापेक्षा जास्त गरज अन्नाची असते आणि तेच अन्न बळीराजा कमवत असतो, अफाट कष्ट करत असतो तेव्हाच भाकर खायला मिळते माणुसकीच्या नात्याने एवढी तरी त्याची जाणीव असू द्यावे व त्याच्यासाठी एकदाचे आपले काम बाजूला सारून त्याच्या विषयी विचार करावे तो जगाचा पोशिंदा आहे कोणीही विसरता कामा नये.

# औरंगजेबचा पुळका कशासाठी ?

आधुनिक केसरी

**महाराष्ट्रात सरकारने औरंगाबाद शहराचे अधिकृत नामकरण छत्रपती संभाजीनगर केल्या पासून राज्याचे राजकीय वातावरण ढवळून निघाले. असून राज्या मध्ये परकीय आक्रमक आणि क्रूर धर्मान्ध औरंगजेबाचे उदात्तीकरण करण्याची स्पर्धा राजकीय नेत्यां मध्ये सुरु झाली आहे. गेल्या काही महिन्या पूर्वी खासदार ओवेसी यांनी राजकीय मतांच्या फायद्या साठी औरंगजेबच्या कबरीवर जाऊन माथा टेकला होता आता गल्लीबोळातील राजकीय कार्यकर्ते ते राज्य पातळी वरील बडे राजकीय नेते सुद्धा औरंगजेबाचे उदात्तीकरण करण्यात धन्यता मानत आहेत.**

कुठे औरंगजेबाचे फोटो झळकत आहेत तर कोठे जयजयकार होत आहे मतांचे ध्रुवीकरण करण्यासाठी राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी सुद्धा औरंगजेब उदात्तीकरण करतांना छत्रपती संभाजीनगरला आपण औरंगाबादच म्हणणार आहोत छत्रपती संभाजीनगर म्हणणार नसल्याचे जाहीर वक्तव्य केलेल आहे शरद पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षा कडून काही वर्षा पूर्वीच संभाजी राजे यांची हत्या करणाऱ्या व शिवरायांचे सरसेनापती नेतोजी पालकर यांना बाटवून मोहम्मद कुली खान करणाऱ्या क्रूर औरंगजेबाला सुफी संत पदवी बहाल करण्यासाठी आंदोलन केलेल आहे खासदार ओवेसी पाठोपाठ प्रकाश अंबेडकर यांनी सुद्धा औरंगजेबच्या कबरीवर जाऊन माथा टेकला आहे सोबतच हिंदू समाजाची दिशाभूल करणारे काही वक्तव्य सुद्धा केली आहेत वास्तविक पाहता महाराष्ट्राच्या भूमित धर्मरक्षक संभाजी राजे यांची हत्या मनुस्मृति नुसार नव्हे तर कुरआन च्या आदेशा प्रमाणे अत्यंत निरघुनपणे औरंगजेबाच्या आदेशा नुसार झाली आहे आणि संभाजी राजे यांच्या

हत्या औरंगजेबने इस्लामी धर्मगुरु सल्लागार यांच्या सल्लयाने केली आहे संबधी डॉ.जयसिंगराव गायकवाड यांच्या शिवपुत्र छत्रपती राजाराम महाराज विस्तृत माहिती असून तत्कालीन इतिहासिक कागदपत्रे उपलब्ध आहेत औरंगजेबने संभाजी राजे यांच्या हत्या प्रमाणे अनेक हिंदू वीरांच्या हत्या केलेल्या आहेत गुरु तेगबहादुर व गुरु पुत्र फतेहसिंग व जोरावरसिंग यांना जीवंतपणे भिंती मध्ये गाडून त्यांच्या हत्या केल्या आहेत आता सुद्धा उत्तर प्रदेशातील कमलेश तिवारी पासून उदयपुरच्या कन्हैयालाल यांच्या हत्या इस्लामी शासकांच्या पध्दतीने केलेल्या आहेत आपल्या देशात कायद्याचे राज्य असतांना व संविधानाचे विविध आयुध उपलब्ध असतांना हत्या का ? त्यामुळे संभाजीराजे यांच्या हत्याचा संबंध मनुस्मृति सोबत जोडणे एक शुद्ध ढोंग आहे कांगावा आहे तसेच सत्तेसाठी आपल्या रक्ताच्या नात्यातील भाऊबंधुची हत्या करणारा औरंगजेब कोणाचाही आदर्श होऊ शकत नाही परंतू गेल्या तिन-चार दशका पासून धर्मरक्षक संभाजी महाराज यांच्या

बलिदानाच्या इतिहासाचे मोठया प्रमाणात विकृतीकरण करण्याचा व त्याद्वारे हिंदू समाजात संभ्रम व बुध्दिभेद निर्माण करण्याचे षड़यंत्र सुरू आहे प्रकाश अंबेडकर यांच्या पूर्वी सुद्धा काही बाजारू विचारवंत तथा स्वंयघोषित विचारवंत मंडळीनी संभाजी राजे यांच्या

हत्या संबंधी सामाजात धादांत खोटया इतिहासाचा प्रचार करून हवेला लाथा मारण्यचा प्रकार केलेला आहे पण त्यांच्या खोट्या प्रचाराचा कोणताच प्रभाव तरुण मंडळीवर झालेला नाही हजारों तरुण संगमनेर येथील संभाजी राजे कैद ते बलिदान दिन असा बलिदान मास पाळत असतात व कृतज्ञता व्यक्त करतात त्यामुळे संभाजी राजे यांच्या गौरवशाली इतिहासाचे विकृतीकरण थांबविण्याची नितांत आवश्यकता सुद्धा आहे छत्रपती शिवराय व संभाजी राजे यांनी हिंदू समाजातील अठरापगड आणि बाराबलुतेदार हिंदू समाजाला भगव्या ध्वजा खाली एकत्र करुन हिंदुस्तान मध्ये एक छत्री असलेल्या परकीय इस्लामी सत्ते विरुद्ध लढा उभारला होता हातात शमशेरी उचलून ईस्लामी सिंहासन उलथापालथी केली होती परकीय इस्लामी आक्रमकांच्या छाताडावर पाय ठेवून हिन्दुसाम्रज्य सुद्धा निर्माण केले होते रायगढ़वर फडकणारा भगवाध्वज इस्लामी सत्तेच्या डोळ्यात सतत खुपत होता त्यामुळे इस्लामी सत्ता स्वराज्या विरोधी होत्या शिवरायांच्या निधना नंतर संभाजी राजे यांच्या नेतृत्वात मावळा स्वराज्याचा विस्तार करण्यासाठी हाता मध्ये तलवार घेऊन सज्ज होता औरंगजेबाने तर संभाजी राजे यांची प्रचंड धास्ती घेतली होती त्यामुळे हिंदू समाजात दहशत निर्माण करण्यासाठी व स्वराज्य बुडविण्या साठी औरंगजेबाने संभाजी राजे यांची हाल हाल करून हत्या केली होती आणि हत्या नंतर हिंदू समजतात दहशत निर्माण करण्या साठी त्यांच्या देहाची विटम्बना सुद्धा केली होती संभाजी राजे यांच्यावर भयानक अत्याचार करणाऱ्या औरंगजेबाचा अचानक पुळका आपल्याला का येत आहे ? औरंगजेबाच्या छावणी मध्ये संभाजी राजे यांच्यावर झालेले अत्याचार, दिलेल्या यातना काढलेले डोळे सोललेल शरीर रक्ताच्या थारोळयात त्यांनी फोडलेला टाहो राज्याच्या मुखातुन निघालेल्या किंकाळया महाराष्ट्रातील राजकीय नेते आपल्या राजकीय फायद्या साठी विसरले असतील पण शिवराय व संभाजी राजे यांचा पाईक असलेला महाराष्ट्रातील सामान्य हिंदू समाज संभाजी राजे यांचे बलिदान व संभाजी राजे यांच्या वरील अत्यचार कधीच विसरणार नाही तसेच संभाजी राजे यांची हत्या करणाऱ्या क्रूर औरंगजेबाचे उदात्तीकरण हिंदू समाज कधीच मान्य करणार नाही जागे झालेला मावळा क्रूर औरंगजेबच्या विरुद्ध आणि औरंगजेबचे उदात्तीकरण करणाऱ्या मानसिकते विरुद्ध व्यक्त होइलच एवढे मात्र निश्चित आहे परकीय इस्लामी सत्तेने आपल्या देशातील शेकडो हिन्दू मंदिरे उध्वस्त केली आहेत तालवारीच्या जोरावर प्रचंड बाटबाटवी सुद्धा केली आहे झिजिया सारखा जुलमी कर फक्त हिंदू समाजावर लावला होता हिंदू समाजाला तीर्थ यात्रा करण्यास सुद्धा मज्जाव करण्यात आला होता शिवपुत्र संभाजी राजे यांचा हत्या प्रमाणेच सिख गुरु तेगबहादुरसिंग ते हिंदू वीर बंदा बैरागी यांची सुद्धा हाल हाल करुन निरघुन हत्या केलेल्या आहेत दिल्लीच्या चाँदनी चौक मध्ये लाकड कापणाऱ्या आरीने हिंदू कापले हिंदू समाजावर अत्याचार करणाऱ्या इस्लामी सत्ते मध्ये औरंगजेब सर्वात क्रूर इस्लामी शासक होता त्यामुळे औरंगजेब सहिष्णू सूफी संत कसा ? तसेच राक्षसी प्रव्रुत्तिच्या औरंगजेबचाआपल्या राजकीय मंडळीना एवढा पुळका का येत आहे ? याचा विचार करण्याची आवश्यकता आहे छत्रपती संभाजी महाराज महाराष्ट्राचे नव्हे संपूर्ण देशाचे श्रध्दास्थान आहे ते कोण्याही एका जातीपातीचे नाहीत किंवा त्यांच्यावर कोणत्याही एका विशिष्ट समाज किंवा राजकीय पक्ष यांची मक्तदारी किंवा ठेकेदारी सुद्धा नाही त्यामुळे संभाजी राजे यांच्या हत्या करणाऱ्या व नेतोजी पालकर यांना बाटवणाऱ्या औरंगजेबाचे उदात्तीकरण कोणालाच मान्य होणार नाही औरंगजेबाचे उदात्तीकरण करुन शिवशंभु भक्त

असण्याचा कांगावा करणाऱ्या बेगड़ी मंडळीच्या निष्ठा तपासण्याची आता आवश्यकता आहे शेवटी औरंगजेबचा एवढा पुळका कशासाठी ? हा प्रश्नांची खदखद सर्वाच्या मनात आहे असे म्हणण्यास हरकत नाही.



अशोक राणे, अकोला भ्रम.9423658385



# मोबाईलपासून मुलांना वाचवायचे असेल तर हातात द्या पुस्तक

आधुनिक केसरी

आमचा सोनू मोब्राईलशी इतका मस्त खेळतो की मला घरातील कामे अगदी निवांत करता येतात स्वाती शेजारच्या सुवर्णाला अभिमानाने सांगत होती. हो का, अरे वा छानच. सुवर्णा कौतुकाच्या स्वरात म्हणाली. अगं स्वाती, तुला काय सांगू बघ.आमची हेमांगी तर गेम खेळण्यात एवढी रमते की तहान भूकही विसरते. आणि हो, तुला सांगते फोटो तर इतके सुंदर काढते की आमच्या घरात फोटोसाठी मोबाईल तिच्याकडेच असतो. सुवर्णाने असे सांगितल्यावर स्वातीनेही आश्चर्याने तिचे कौतुक केले.

यातील सोनू अडीच तीन वर्षाचा तर हेमांगी दुसरीत शिकणारी मुलगी. खरं तर कमी अधिक प्रमाणात ब-याच कुटुंबात मुलांना सांभाळायला मोठे माणूस नाही किंवा स्वयंपाक करणे, भांडी घासणे , कपडे धुणे , घराची स्वच्छता करणे अशा कामाच्या वेळी मुलांचा अडथळा किंवा व्यत्यय नको म्हणून खेळायला मोबाईल दिला जातो. त्यात असणारे गेम्स,व्हिडीओ, छोटी मुले आवडीने पाहतात खेळतात. इतक्या लहान वयात त्याला मोबाईलमधील सगळे येते याचा आपल्या अभिमान आणि कौतुक वाटते.नातेवाईकांना किंवा मित्रमंडळीना मोठ्या आनंदाने आपण सांगत असतो.कालांतराने त्या लहान बाळाला मोबाईलची इतकी सवय होते की खेळताना ,जेवताना ,अगदी झोपताना सुद्धा जवळ मोबाईलच हवा असतो.नाही दिला तर ते चिडते ,रुसते ,रागवते घरातील वस्तूंची आदळआपट करते. लहान आहे .त्याला अजून कळत नाही .मोठा झाल्यावर नाही असे करणार. असे म्हणून त्याला शांत करण्यासाठी त्याच्या हाती मोबाईल दिला जातो.एक प्रकारे आपणच त्याला मोबाईलच्या विळख्यात अडकवत असतो.हे आपल्या लक्षात येत नाही.ज्यावेळी लक्षात येते त्यावेळी परिस्थिती हाताबाहेर गेलेली असते. मूल आपले काही ऐकत नाही. त्यावेळी आपण हतबल होतो. चिंताग्रस्त होऊन काळजीत पडतो.काय करावे सुचत नाही. आपणच ही परिस्थिती ओढवून घेतलेली असते. मोबाईल हे एक संदेशवहनाचे साधन आहे.आपण त्याचा मुलांसाठी खेळणं म्हणून वापर केल्याचा परिणाम आपल्याला भोगावा लागतो. मोबाईलपासून मुलांना वाचवायचे असेल तर छोट्या मुलांच्या हातात प्राणी,पक्षी ,फुले,फळे,वाहने, घरातील वस्तू ,विविध साधने यांची रंगीबेरंगी मोठी चित्रे असणारी पुस्तके द्या.

शाळेत जाणाऱ्या मुलांच्या हातात अक्षरांचा मोठा टाईप व चित्रे असणारी गोष्टीची पुस्तके द्या.मुले आवडीने पुस्तके वाचतील.मुलांना वाचनाचे व्यसन लागले तर त्याचे आयुष्य घडेल.परंतु लहानपणीच मोबाईलचे व्यसन लागले तर आयुष्य बिघडेल. कारण पुस्तक वाचल्याने मस्तक घडते तर मोबाईलने बिघडू शकते. आपण मुलांना कोणत्या सवयी लावतो हे सर्वस्वी पालक म्हणून आपल्यावर अवलंबून असते.मुले ही अनुकरणप्रिय असतात.आपल्या प्रत्येक गोष्टीवर त्यांचे लक्ष असते. त्यासाठी मोबाईल हा अगदी गरजेपुरता आणि कामासाठीच थोडा वेळ वापरायचा.मगच तुम्ही मुलांना मोबाईलचे फायदे तोटे सांगू शकता.आणि त्यांना मोबाईलपासून वाचवू शकता. कोणतीही गोष्ट चांगली किंवा वाईट नसते.आपण त्याचा कसा आणि किती वापर करतो यावर अवलंबून असते.

लक्ष्मण जगताप, बारामती

मनोजवं मारुततुल्यवेगमं जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठम्।
वातात्मजं वानरयूथमुख्यं श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये।।



श्री भद्रा मारोती छत्रपती संभाजीनगर
जयसुख पटेल, जय भद्रा हनुमान सुख:तू रामायण, सिमंत गल्ली,
शहागंज गांधी पुतळ्याजवळ, छत्रपती संभाजीनगर मो : 9422201977

Walsekar Metal Private Limited
Manufacturer of Aluminium Alloy Cas ting
Address : K-58, MIDC AREA WALUJ, AURANGABAD-431136

# आपला दवाखाना योजनेचा शुभारंभ

आधुनिक केसरी न्यूज



**फुलंब्री :** तालुक्यातील गोरगरीब व सर्वसामान्य जनतेसाठी सरकार नेहमी प्रयत्नशील असून गरिबांना रुग्णसेवा वेळेत मिळावी यासाठी शासनाने हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाने आपला दवाखाना योजना सुरू केली आहे. या योजनेचा जास्तीत जास्त गरिबांनी लाभ घ्यावा असे आवाहन आमदार हरिभाऊ बागडे यांनी केले. फुलंब्री येथे हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना जुन्या नगरपंचायत सुरु झाला. या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी बाजार समिती सभापती अनुराधा चव्हाण, भाजपचे तालुकाध्यक्ष सुहास शिरसाठ, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर शेळके, तहसीलदार डॉ. कृष्णा कानगुले, गटविकास अधिकारी संजय गायकवाड, वैद्यकीय अधिक्षक डॉ. अभिजित खंदारे, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य शिवाजी पाथ्रीकर, जितेंद्र जैस्वाल, माजी सभापती सर्जेराव मेटे, सविता फुके, भाजपचे शहराध्यक्ष योगेश मिसाळ, ओबीसीचे तालुका अध्यक्ष राम बनसोड, युवा शहराध्यक्ष वाल्मीक जाधव,जिल्हा सरचिटणीस मनोज चिकटे,तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रसन्न भाले, मुख्याधिकारी नगरपंचायत ऋषीकेश भालेराव, सहायक गटविकास अधिकारी विनय राठोड, एकनाथ ढोके, अकबर पटेल आदींची उपस्थिती होती.

# महिलेला अश्लील मेसेज करणाऱ्या ब्रँच मॅनेजरची शिवसेनेने काढली धिंड

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** नशेच्या धुंदीत असलेल्या रिलायन्स लाइफ इन्शुरन्स ब्रांच मॅनेजर ने बँकेतील कर्मचारी महिलेला अश्लील शब्द पाठवल्याने शिवसेनेने मजबूत चोप दिला आहे व त्याची नागडी धिंड काढून पोलिसांच्या ताब्यात दिले.

फिर्यादीवरून आझाद नगर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुझे प्यार हो गया असा अश्लील मेसेज याच कंपनीत काम करणाऱ्या एका महिलेच्या मोबाईलवर मॅनेजरने टाकला होता. याबाबत त्याला समाज देऊनही त्याने अश्लील मेसेज पाठवणे बंद न केल्याने पीडित महिलेने उबाटा सेनेच्या पदाधिकाऱ्यांकडे धाव घेत घडलेली घटना कथन केल्याने संतप्त झालेल्या उबाटा सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी गल्ली नंबर सहा येथील रिलायन्स लाइफ इन्शुरन्स येथील कंपनीत जाऊन असिस्टंट ब्रांच मॅनेजरला चोप दिला. कंपनीच्या कार्यालयापासून ते आझाद नगर पोलीस स्टेशन पर्यंत असिस्टंट मॅनेजरला चोप देत आझाद नगर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. पुढील कारवाई पोलीस करत आहेत.

# 'अभंग प्रभू'च्या साथीने रिक्षाचालकाचा राज होणार डॉक्टर

## सामाजिक बांधिलकीतून डॉ. अभंग प्रभू यांनी उचलली जबाबदारी; तीन मुलींना एमबीबीएससाठी शिष्यवृत्ती

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** वडील रिक्षाचालक... आई अंगणवाडी सेविका... मनाशी डॉक्टर होण्याची जिद्द... वर्षभर घेतलेले कठोर परिश्रम... डॉ. अभंग प्रभू यांचे मिळालेले मार्गदर्शन... एमबीबीएसला प्रवेश मिळवण्याचे पूर्ण झालेले स्वप्न... आणि कष्टकरी आईवडिलांसह त्याच्या चेहऱ्यावर फुललेला आनंद... ही गाथा आहे रिक्षाचालकांचा मुलगा असलेल्या राज गजानन दामधर याची. आता राज अभंग प्रभू मेडिकल अकॅडमीच्या साथीने डॉक्टर होणार आहे.

सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून अकॅडमीचे (एपीएमए) संस्थापक संचालक आणि प्रसिद्ध प्रसूतिरोग व स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. अभंग प्रभू यांनी वर्षभरापूर्वी राज दामधर याची आर्थिक परिस्थिती समजून घेत एका अटीवर प्रवेश दिला. ५० हजारांची अनामत रक्कम ठेवायची आणि सचोटीने अभ्यास करून 'नीट' परीक्षेत ६०० पेक्षा अधिक गुण मिळवून ती रक्कम परत मिळवायची अशी ती अट होती. राजने डॉ. प्रभूंचा विश्वास सार्थ ठरवत 'नीट' परीक्षेत ६०७ गुण मिळवले. डॉ. प्रभू यांनी ठरल्याप्रमाणे अनामत रकमेचा धनादेश परत करण्यासह त्याचे एमबीबीएसचे चारही वर्षांचे शुल्क भरण्याचे ठरवले. त्याचा धनादेश त्यांनी शुक्रवारी राज व त्याच्या कुटुंबीयांकडे सुपूर्त केला. तसेच राज यांच्यासह अकॅडमीतील अन्य २० यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. प्रसंगी त्याचे वडील गजानन दामधर, आई प्रमिला दामधर, 'एपीएमए'चे संचालक प्रा. सचिन हळदवणेकर, संचालिका डॉ. हिमानी तपस्वी, समुपदेशिका डॉ. शीतल श्रीगिरी, डॉ. राजेश देशपांडे, डॉ. संजय वाघ आदी उपस्थित होते. प्रसंगी डॉ. प्रभू यांनी यावर्षीपासून तीन गरीब व गरजू मुलींना एमबीबीएसच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्याची घोषणा केली.

डॉ. अभंग प्रभू म्हणाले, "गेल्या २२ वर्षांपासून 'एपीएमए' डॉक्टर घडविण्यासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण देत आहे. मुंबई, सांगली आणि पुण्यात 'एपीएमए' कार्यरत आहे. पुणे शाखेत जवळपास ७५० विद्यार्थी 'नीट' परीक्षेसाठी मार्गदर्शन घेत आहेत. वैद्यकीय क्षेत्रात डॉक्टरकी करणारे, तसेच तज्ज्ञ शिक्षक येथे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत आहेत. एमबीबीएसला पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांचे सर्वाधिक प्रमाण ही 'एपीएमए'ची खासियत आहे. राज यांच्याप्रमाणेच गरीब व गरजू मुलींना प्रोत्साहन व आधार देण्यासाठी यंदा तीन मुलींच्या एमबीबीएसची फी 'एपीएमए' भरणार आहे.

राज रामधर याने डॉ. अभंग प्रभू व इतर शिक्षकांचे आभार मानले. राज म्हणाला, "माझे मुळगाव बुलढाण्यातील संग्रामपूर आहे. वडिलांचे बीएस्सी, तर आईचे १२ वीपर्यंत शिक्षण झाले आहे. मोठ्या भावाने डीफार्मसी केले आहे. मात्र, नोकरी नाही. पुण्यात आंबेगाव पठार येथे राहत असून, वडील गेल्या २५ वर्षांपासून रिक्षा चालवत आहेत. आई खासगी अंगणवाडीत सेविका आहे. गेल्या वर्षी आर्थिक परिस्थितीमुळे गावी क्लासेस लावले व मेहनत केली. पण थोडक्या मार्कांवरून एमबीबीएस हुकले. 'नीट' पुन्हा देण्यासाठी व तयारीसाठी 'एपीएमए'कडे आलो. इथली फी माझ्या आवाक्याबाहेर होती. त्यावेळी डॉ. प्रभू सरांना माझी आर्थिक परिस्थिती सांगितली. सरांनी माणुसकीच्या जाणिवेतून मला सहकार्य केले. फी न भरता मला वर्षभर क्लासेस करता आले. उत्तम मार्गदर्शन व अभ्यासातील सातत्य याच्या जोरावर मला ६०७ गुण मिळाले. एमबीबीएसच्या खर्चासाठी 'एपीएमए' अर्थसहाय्य करणार आहे, याचा मला खूप आनंद झाला असून, याची जाणीव ठेवून चांगल्या पद्धतीने अभ्यास करून डॉक्टर होणार आहे. सामाजिक जाणिवेतून डॉक्टरकी करण्याचे आश्वासन देतो. डॉ. हिमानी तपस्वी म्हणाल्या, "डॉक्टर होण्याची जिद्ध उराशी बाळगून, मेहनतीने व आम्ही केलेल्या मार्गदर्शनानुसार चांगला अभ्यास करत वैद्यकीय प्रवेश मिळवणाऱ्या राजची संघर्षगाथा अनेकांसाठी प्रेरणादायी आहे. नैराश्याने ग्रासलेल्या, आई-वडिलांकडून सगळ्या गोष्टी मिळूनही एकाकी झालेल्या मुलांना राजप्रमाणे मेहनतीने यश मिळवायला हवे. शिष्यवृत्तीसाठी पात्र मुलींकडून अर्ज मागविण्यात येणार असून, त्यातून तीन मुलींची निवड केली जाणार आहे. अर्ज करण्यासाठी apmapuneco@gmail.com या ईमेलवर किंवा ८५९१५०२२९१ व ९८२२३७८५०५ या मोबाईलवर संपर्क करावा, असे डॉ. अभंग प्रभू यांनी सांगितले.

**'एपीएमए'विषयी :** 'नीट' करू इच्छिणाऱ्या व गरजू विद्यार्थ्यांमधून वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ घडवणाऱ्या 'एपीएमए'ची स्थापना प्रसिद्ध प्रसूती व स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. अभंग प्रभू, प्रा. सचिन हळदवणेकर, रेडिओलॉजिस्ट डॉ. हिमानी तपस्वी यांनी केली. 'नीट'च्या तयारीसह विद्यार्थ्यांना येथे समुपदेशन, वेळ व्यवस्थापन कौशल्य, परिणामकारक परीक्षेच्या टिप्स आदी गोष्टी पुरविल्या जातात. पुण्यात 'एपीएमए'चे केंद्र १२०१, दिनकर व्हर्टेक्स, फर्ग्युसन कॉलेज मेन गेटसमोर, गोपाळकृष्ण गोखले पथ, पुणे येथे आहे. ऑनलाईन किंवा ऑनसाईट सर्व्हिस येथे सकाळी ९ ते संध्याकाळी ७ वाजेपर्यंत उपलब्ध आहे.




# पूजा शहाणेचे सेट परीक्षेत यश

आधुनिक केसरी न्यूज



**जिंतूर :** तालुक्यातील पूजा अशोकराव शहाणे यांनी सहाय्यक प्राध्यापक पदासाठी आवश्यक असलेली सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत मराठी या विषयात सेट परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. सौ पूजा अभिषेक डहाळे यांनी त्यांच्या शैक्षणिक कार्यची सुरुवात २००९ या साली केली होती.२००९ ते २०२३ या कालखंडात त्यांनी D.ed ,B.ed, MA, M.ed , या पदवी आणी पदविका अभ्यासक्रमात यश प्राप्त केलं तसेच CTET ,TET, या शिक्षक पात्रता परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत व त्यासोबत त्यांनी या वर्षी झालेल्या सेट ( SET )या परीक्षेत मराठी या विषयात उत्तम असे यश प्राप्त केले त्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन. सौ पूजा अभिषेक डहाळे ( सातोनकर ) याच्या मते हे सर्व शैक्षणिक यश कौटूबिक सहकार्यातून प्राप्त झाले .

# मनमाड पोलिसांकडून ४५ जनावरे ताब्यात

आधुनिक केसरी न्यूज

**मनमाड :** शहरातील पांझण नदीपात्रालगत कत्तलीच्या उद्देशाने बांधण्यात आलेल्या पाच गाई, ३४ बैल अशी ३९ जनावरे तसेच मनमाड-मालेगाव राज्यमार्गावर वाहनातून सहा जनावरे अशी एकूण ४५ जनावरे पोलिसांनी ताब्यात घेतली. या प्रकरणी शहर पोलीस ठाण्यात दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलीस शिपाई समाधान देशमुख यांनी दिलेल्या तक्रारीनुसार पांझण नदीलगत एफसीआय खाणीशेजारी पाच गाई आणि ३४ गोऱ्हे अशी एकूण ३९ गोवंश जनावरे कुणीतरी कत्तलीच्या इराद्याने आणून त्यांना त्रास होईल, अशा प्रकारे दोरखंडानी निर्दयतेने बांधून ठेवली होती. या प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरुध्द पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

# पोलीस अधीक्षक यांच्यातर्फे पीआय शिंदे यांना बक्षीस

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** तालुका पोलिसांना अखेर यश देशभर दारूचे नेटकवर्क असलेल्या व पोलिसाच्या मृत्यूला कारणीभूत ठरलेल्या शिरूडचा दिनेश गायकवाड उर्फ दिनू डॉन याला धुळे तालुका पोलिसांनी अटक केली आहे.

पोलिस निरीक्षक दत्तात्रय शिंदे यांनी त्याला परभणीतून उचलून जेरबंद केले. त्यापूर्वी दिनेश भायकवाड पोलिसांच्या भितीने नेपाळसह देशभरात विविध जागी लपून बसला होता. धुळे तालुका पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक दत्तात्रय शिंदे यांनी दि. ४ डिसेंबर २०२२ रोजी एका ट्रकमधून रॉकेट देशी संत्रा नांव असलेल्या दारूसह ९५ लाख ७७ हजार ८०० रुपये किमतीचा मुददेमाल आणि बनावट दारू तयार करण्याची साधने जप्त केली होती. त्यागुन्हयात सुमारे १० आरोपीतांचा सहभाग असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झालेले होते. नऊ आरोपीतांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली होती. तसेच नमुद गुन्हयातील मुख्य आरोपी नामे दिनेश गायकवाड ऊर्फ दिनू डॉन, रा. शिरुड, ता. जि. धुळे हा गुन्हा घडल्यापासून फरार होता.

पोनि दत्तात्रय शिंदे यांनी त्यांनी तांत्रिक कौशल्याचा व गोपनीय माहितीचा वापर करून धुळे तालुका पोलीस ठाण्याच्या तपास पथकातील पोलीस उप निरीक्षक अनिल सुभाष महाजन, पोहेकॉ प्रविण सदाशिव पाटील, पोना उमेश पवार, पोना कुणाल पानपाटील यांच्या पथकाला वेळोवेळी तांत्रिक माहिती देवून मुख्य आरोपी नामे दिनेश निंबा गायकवाड ऊर्फ दिनू डॉन रा. शिरुड, ता. जि. धुळे याचा शोध सुरु ठेवला होता. आरोपी पुन्हा पुन्हा मोबाईल सीमकार्ड व मोबाईल बदलत असल्याने आणि असता त्याचा ठावठिकाणा नेपाळ, गोवा, उत्तरप्रदेश व बिहार आशा ठिकाणी थांबुन सतत बदलत असल्याने तो मिळुन येत नव्हता.

तेव्हा पोनि दत्तात्रय शिंदे यांनी धुळे तालुका पोलीस स्टेशनच्यापथकासह तांत्रिक तपासाचे आधारे आरोपी हा दि. २८ जून रोजी गंगाखेड, जि. परभणी येथे असल्याचे समजल्याने आरोपीला गंगाखेड शहरातील बस स्टॅन्ड जवळील जगदंबा हॉटेल जवळ जि. परभणी येथून दि. २९ जून रोजी त्यास ताब्यात घेतले. त्यास धुळे तालुका पोलीस स्टेशनला आणुन दि.२९ जून रोजी अटक केली आहे.





# शाहू महाराज जयंती उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील मतेवाडी येथील आदर्श प्राथमिक विद्यालय, व ग्रामगीता माध्यमिक विद्यालयात राजश्री शाहु महाराज यांची 149 वी जयंती साजरी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी अश्विनी जाधव यांची उपस्थिती होती. याप्रसंगी राजश्री शाहु महाराज यांचे प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी विद्यार्थिनी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच शिक्षिका सविता लोखंडे यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून ग्रामगीता विद्यालयाचे मुख्ध्यापक योगेश जाधव यांची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सचिन निर्मळ, अन्सार शेख, अनिल गायकवाड, संदीप निधोंनकर, संदीप काळे, वैशाली तायडे, कल्याणी राजपूत, पुष्पा काकडे, पूजा शिरसाठ,जिवन पवार, भाऊसाहेब शिरसाठ, आदींसह शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्र संचालन परसराम घुगे यांनी केले तर आभार निता गायकवाड यांनी मानले.

# पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** आषाढी एकादशीनिमित्त विजयनगर गारखेडा परिसर छत्रपती संभाजीनगर येथून दरवर्षीप्रमाणे यावर्षीही पायी दिंडी पालखी सोहळ्याचे आयोजन ह.भ.प पवन महाराज खाडे यांच्या नियोजनाखाली करण्यात आले आहे.दिंडीमध्ये भारूडे फुगड्यांचा आनंदमय सोहळा तसेच ज्ञानेश्वर माऊली ज्ञानराज माऊली तुकाराम या गजरात दिंडीचे प्रस्थान प्रमोदजी खाडे ( दिंडीनेतृत्व ) यांच्या निवासस्थाना जवळून २९ जुन २०२३, गुरुवार रोजी ठिक सकाळी ७:३० वा. विजयनगर सांस्कृतिक क्रीडा संकुल धरमवीर खासदार मोरेश्वर सावे उद्यान श्रीराम मंदिरापासून झाले. दिंडीमार्गात प्रसाद वाटप तसेच फराळाचे वाटप करण्यात आले.

असंख्य वारकरी व माऊली भक्त दिंडीमध्ये सहभागी होणार असून आपणही दिंडीत सहभागी होऊन हरिनामाचा आनंद घ्यावा, असे आवाहन उपक्रमप्रमुख शिवाजी ढेपले ( महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटना कार्यकारणी सदस्य ) मार्गदर्शक बाळकृष्ण शेवंते ( विशेष कार्यकारी अधिकारी ), कार्यवाहक सखाराम भोजने ( पोलीस बॉईज असोशियन ) ईश्वर शिंदे ( मंडप असोशियन महाराष्ट्र राज्य ) यांनी व वार्डातील नागरिकांनी केले होते.



# आषाढी एकादशी व बकरी ईदनिमित्त भारतीय संविधानाच्या उद्देशिकांचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**चिंचोली लिंबाजी :** येथे दि. 29 जून रोजी आषाढी एकादशी व बकरी ईद निमित्त वंचित बहुजन आघाडी तर्फे भारतीय संविधानाची उद्देशिकांचे वाटप करण्यात आले. या भारत देशात सर्व धर्मीय जर एकत्र राहत असेल. भारतीय संविधानामुळे. त्यामुळे आज हिंदु मुस्लिम बांधवाचा आनंदाचा दिवस असताना.वंचित बहुजन आघाडी कार्यकत्यांतर्फे भारतीय संविधानाची उद्देशिकांचे वाटप करण्यात आले. आपुलकी, बंधुत्व प्रेमाचे प्रतिक म्हणुन वंचित कार्यकर्ते तातेराव भुजंग यांनी दोन्ही सणानिमित्त ही संकल्पना राबविण्यात आली. या वेळी वंचित कार्यकर्ते तातेराव भुजंग, अमृत चौघुले, भागवत चोतमोल,मनोज बावस्कर व इतर कार्यकर्ते व ईतर गावकरी उपस्थित होते



# आषाढीनिमित्त साबुदाना खिचडी वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** श्री रामनगर येथील विठ्ठल चौकात आज आषाढी एकादशीच्या निमित्ताने उपवासाचे फराळ , शाबुदाना खिचडी केळी फराळ वाटप करण्यात आले. उद्योगपती सतीश देशमुख यांच्या सहभागातून व महाविकास आघाडी, कम्युनिस्ट पक्षाच्या, सामाजिक कार्यकर्ते सुभाष पाटील पांडभरे, सुभाष शुक्ला, दीपक मस्के, अरुण जाधव, भास्कर लहाने, अमोल संकपाळ, अमोल संकपाळ, हेमंत नरवडे, दशरथ मानवतकर, संगीता राठोड , टोपे मामा, सुरेश हिवराळे, गोविंद चव्हाण, राजेश देशमुख, पांडुरंग साबळे, कल्याण लिपणे, आनंद बनकर, भीमराव शेजुळ, कैलास झिने, विनायक पवार, तुकाराम साबळे, गोविंद चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून मुकुंदवाडी पोलीस स्टेशनचे पीआय ससे साहेब पोलीस कॉन्स्टेबल अनिल तुपे, साहेब यांच्या हस्ते वारकरी संप्रदाय व भाविक भक्त स्थानिक नागरिकांना फराळाचे वाटप करण्यात आले. या वेळी भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून फराळाच्या महाप्रसादाचा लाभ घेतला.



# एथर एनर्जीची ऑरिकमधील गुंतवणूक औद्योगिक विकासाला चालना देईल

## अर्थराज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** शहरात मोठी गुंतवणूक यावी यासाठी मागील एक दीड वर्षांपासून प्रयत्न केले जात होते. यासाठी चेंबर ऑफ मराठवाडा इंडस्ट्रीज अँड अग्रिकल्चर (सीएमआयए) संस्थेने पुढाकार घेतला असून, इलेक्ट्रिक दुचाकी उत्पादनामध्ये अग्रगण्य असलेल्या एथर एनर्जीच्या ऑरिकमधील गुंतवणुकीमुळे आपल्या विभागात औद्योगिक विकासाला चालना मिळणार असून, इलेक्ट्रिक दुचाकी उत्पादनात अग्रेसर असणाऱ्या अथर कंपनीमुळे ईव्ही इकोसिस्टिम विकसित होण्याला मोठी चालना मिळेल, असे मत अर्थराज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांनी व्यक्त केले. ते सीएमआयए तर्फे आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते. याप्रसंगी राज्याचे सहकार आणि इतर मागास बहुजन कल्याण मंत्री मा. अतुल सावे, ज्येष्ठ उद्योजक राम भोगले, मुकुंद कुलकर्णी, प्रीतीश चटर्जी, सीएमआयए अध्यक्ष नितीन गुप्ता, मानद सचिव अर्पित सावे, उपाध्यक्ष दुष्यंत पाटील, माझी अध्यक्ष शिवप्रसाद जाजू, कोषाध्यक्ष उत्सव माच्छर, सहकोषाध्यक्ष अथर्वेशराज नंदावत यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. कराड म्हणाले की अथर एनर्जी सोबतच पिरामल फार्मा, कॉस्मो फिल्म्स या कंपन्यांनी ऑरिक येथे मोठ्या गुंतवणुकीची घोषणा केली आहे. या प्रकल्पांमुळे बिडकीन येथे गुंतवणूक यायला सुरवात झाली आहे. या अँकर प्रकल्पामुळे आगामी काळात मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होईल, असे ते म्हणाले. याप्रसंगी सीएमआयएच्या वतीने अर्पित सावे यांनी ऑरिकमध्ये मेगा प्रकल्प आणल्याबद्दल केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ. भागवत कराड, राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सहकार मंत्री अतुल सावे, उद्योग मंत्री उदय सामंत, उद्योग विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे, ऑरिकचे व्यवस्थापकीय संचालक सुरेश काकानी यांचे आभार मांडले. राज्यात होऊ घातलेल्या मॅग्नेटिक महाराष्ट्राची प्रास्ताविक कार्यक्रम ऑरिक येथे घ्यावा यासाठी प्रयत्न केले पाहिजे असे ते म्हणाले.




**उद्योगांना आकर्षित करण्यासाठी पायाभूत सुविधांच्या विकासावर जोर : अतुल सावे**
या प्रसंगी बोलतांना अतुल सावे म्हणाले की, मराठवाड्याचे ग्रोथ इंजिन म्हणून छत्रपती संभाजीनगरकडे बघितले जाते, येथे मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होईल असा मेगा उद्योग येणे खूप गरजेचे होते. नवीन गुंतवणुक होतांना उद्योगांना चांगल्या पायाभूत अपेक्षित असतात. ही गोष्ट लक्षात ठेवून छत्रपती संभाजीनगर मध्ये पाणी, रस्ते आणि वीज या मूलभूत गोष्टी उपलब्ध करून देण्यासाठी मोठे प्रकल्प राबविले जात आहे.

**अथर कंपनीमुळे मिळेल ५०० कंपन्यांना काम : राम भोगले**
छत्रपती संभाजीनगरमध्ये ऑटोमोबाईल क्षेत्रामध्ये उत्पादन करणाऱ्या कंपन्यांची संख्या मोठी आहे. येथे इलेक्ट्रिक वाहन क्षेत्रातील इकोसिस्टीम विकसित होत आहे. अथर प्रकल्पामुळे येथील बॅटरी, इलेक्ट्रॉनिक्स, प्लॅस्टिक, फॅब्रिकेशन क्षेत्रात काम करणाऱ्या सुमारे ५०० कंपन्यांना अधिकचा व्यवसाय मिळणार आहे, असे मत राम भोगले यांनी मांडले.

**टेस्ला गुंतवणूक ऑरिकमध्ये आणावी : नितीन गुप्ता**
अथर या इलेक्ट्रिक दुचाकी उत्पादक कंपनीने ऑरिकमध्ये गुंतवणूक केली आहे. येथून वर्षाकाठी १० लाख दुचाकी उत्पादनाचा कंपनीचा मानस आहे. देशातील सर्वात मोठी इलेक्ट्रिक दुचाकी उत्पादक कंपनी असून त्याच धर्तीवर देशात येऊ घातलेल्या 'टेस्ला' गिगा गुंतवणूक ऑरिकमध्ये आणण्यासाठी डॉ. कराड आणि अतुल सावे यांनी प्रयत्न करावे, अशी विनंती सीएमआयए अध्यक्ष नितीन गुप्ता यांनी केली. अथर गुंतवणूक यावी याकरिता चेंबरने सर्वतोपरी प्रयत्न केले आहे. यासाठी मुंबई, दिल्ली, बेंगलोर, नागपूर येथे उच्चस्तरीय बैठकीत ऑरिक गुंतवणुकीसाठी कसे योग्य आहे हे पटवून देण्यात आले. आगामी काळात देखील मोठ्या दोन प्रकल्पाची घोषणा होणार असून, सीएमआयए यासाठी कॅटलिस्टची भूमिका पार पाडेल याची ग्वाही त्यांनी दिली.

# जि. प. शिक्षकांनी मिळवली दहा लाखापेक्षा जास्त लोकवर्गणी

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** आयएसओ जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा मल्हारा पंचायत समिती अचलपूर येथे कार्यरत असलेले सहाय्यक शिक्षक बबलू विनायकराव कराळे यांनी जिल्हा परिषद शाळा मल्हारा करिता समाज माध्यमाकडून दहा लाखापेक्षा जास्त लोक वर्गणी गोळा करून शाळेच्या उन्नतीमध्ये भर टाकली शाळा आयएसओ केली.

संपूर्ण शाळा तथा वर्ग डिजिटल करून विद्यार्थ्यांच्या प्रगतीमध्ये मोलाची भर टाकली. रेन हार्वेस्टिंग करून पावसाळ्यामध्ये पडणाऱ्या पाण्याचे व्यवस्थापन केले शाळेच्या वराड्यामध्ये सुशोभीकरणाकरिता लॉन बसवले, शाळेमध्ये सर्व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिल्या. शाळा सिद्धिमध्ये शाळा "अ" श्रेणीमध्ये आणली. याकरिता त्यांना गावचे प्रथम नागरिक सरपंच माननीय नारायणराव जी बोरीकर यांनी त्यांनी मदत केली तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका माननीय कु.शीला सोळंके यांनी मुलाची भूमिका पार पाडली. केंद्रप्रमुख श्रीकृष्ण उघडे यांनी उत्तम रित्या मार्गदर्शन केले.




# क्षेत्र सावळदबारा विठू नामाच्या गजराने दुमदुमला

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील श्रीक्षेत्र सावळदबारा हरि हारेश्ववर विठ्ठल रुक्मिणी मंदिर येथे दि.२९/६/२३ आषाढी एकादशी निमित्त दिंडीचे व विठू रायाच्या पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यातील प्रत्येक चिमुकल्या वारकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद टिपण्यासारखा होता खऱ्या वारीतील वारकऱ्याप्रमाणे सजलेले हे चिमुकले विद्यार्थी एक प्रकारचे अन्टॅक्शन होते. एकादशीचे निमित्त साधून विद्यार्थ्यांनीची बाल दिंडी आणि विठ्ठल-रुक्मिणी व वारकर्यांच्या वेषभुषेत विठुनामाच्या गजरात विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसरात पालखीसह बालदिंडी लक्षवेदक ठरली.विठ्ठल-रुक्मिणी व वारकर्यांच्या वेषभुषेत असलेल्या चि.रुद्ह प्रमोद पाटील,कु.चिकू सुभाष पठ्ठे या बाल वारकरी विद्यार्थिनीने भक्तिगीते व विठ्ठलाचे अभंग गाऊन वातावरण भक्तिमय केले. यावेळी विठू रायाच्या पालखी छत्रपती शिवाजी महाराज चौक,जय भोले शंकर महादेव मंदिर, मारोती मंदिर, राजमाता अहिल्यादेवी होळकर चौक व जय भवानी चौक अशी पूर्ण गावातून व प्रत्येक चौकाऊ वारकरी व विद्यार्थिनींनी रिंगण धरून फुगड्या खेळल्या. अभंगाच्या तालावर टाळ, मृदंगाच्या गजरात पाऊल खेळून रिंगण खेळले. शेवटी विठ्ठल रुक्मिणी मंदिरावर रिंगण सोहळा करत विठ्ठलाची आरती होऊन दिंडीचा समारोप झाला. यावेळी माजी सरपंच स्वातीताई कोलते पाटील, अर्चना राजपूत,रत्नाताई कोलते, लताबाई कोलते,संगीता राजपूत, सिंधूताई ठाकूर, लताबाई गोंडबे, उषाताई उमाळकर, रेखाताई खराटे, मीराबाई परशे महिला व चिमुकले मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व वारकऱ्यांनी हभप बेलाआप्पा करदळे,हभप विशाल महाराज खडके, ह.भ.प. आबाराव कोलते,हभप भागवत महाजन,पंढरी गाढवे, सुरेश काळे, आकाश कळसकर, सुनील राजपूत, सुनील शिप्पलकर यांनी परिश्रम घेतले






अर्जंट फ्लॅट विकणे आहे

नक्षत्रवाडी, छत्रपती संभाजीनगर, (महाराष्ट्र) येथील गट क्र. 8/1, समर्थ एलक्लेव्हमध्ये पहिल्या मजल्यावरील 2 बीएचके फ्लॅट अर्जंट विकणे आहे. एकूण क्षेत्रफळ 910 स्क्वेअर फूट, क्लिअर टायटल, सीएसएमएसएस कॉलेजपासून पाच ते सात मिनिटांच्या अंतरावर, रम्य वातावरणात, मेन रोडच्या अगदी जवळ.

संपर्क : मो. 7588818406

# रामदासस्वामी लिखित रामायणाच्या आवृत्तीचे प्रकाशन डॉ. मोहन भागवत यांच्या हस्ते होणार

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** श्रीसमर्थ वाग्देवता मंदिर, धुळे येथील श्रीसमर्थ रामदासस्वामीं लिखित वाल्मिकी रामायणाच्या संपादित आवृत्तीचा प्रकाशन समारंभ राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांच्या हस्ते करण्यात येणारे आहे. यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात, कोथरूड येथे बुधवार दि. ५ जुलै २०२३ रोजी सायंकाळी ६.०० वाजता प्रकाशन समारंभ होणार आहे. समर्थ वाग्देवता मंदिर धुळ्याचे अध्यक्ष अनंत चितळे तसेच कार्याध्यक्ष देवेंद्र डोंगरे तसेच सत्कार्योत्तेजक सभा धुळ्याचे अध्यक्ष विश्वास नकाणेकर त्याचप्रमाणे चिटणीस सतिश दिक्षित यांनी एका पत्रकाद्वारे सर्व नागरिकांना सर्व भक्तगणांना बहुसंख्येने या प्रकाशन समारंभास मोठ्यात मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.




हिवराळे क्लिनिक ॲण्ड हर्बल हेल्थ केअर

9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन, ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद

उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे

पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन



अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# कलेक्टरसमोर शेतकऱ्यांनी वाचला समस्यांचा पाढा

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** २८ जून रोजी बुलढाणा जिल्ह्याचे कलेक्टर तुम्मोड साहेब जळगाव जामोद तालुक्याच्या दौऱ्यावर आले असता शेतकरी या नात्याने रिपाइंचे युवा जिल्हा अध्यक्ष प्रशांत तायडे आणि तालुक्यातील शेतकऱ्यांनी कलेक्टरच्या समोरच आपल्या समस्या मांडल्या. विशेषतः पेरणी पावसाचे दिवस जवळ येवून सुद्धा शेतकऱ्यांना हवे ते बि बियाने बाजारात मिळत नसुन त्याची कृत्रिम टंचाई निर्मान केल्या जात आहे.त्यामुळे शेतकऱ्यांना नाईलाजाने नको ते बायाने घ्यावे विकत घ्यावे लागत आहे. एकीकडे जिल्ह्यात अधीकाऱ्याकडून जिल्ह्यात बी बीयाने मुबलक स्वरूपात आहे असे सांगितले जाते तर दुसरीकडे अशा प्रकारे कृत्रिम टंचाई निर्माण केल्या जात आहे. त्यामुळे अगोदरच हवालदार झालेला बळीराजा फार अस्वस्थ झाला आहे. सभ्रमाअवस्थेत सापडलेल्या शेतकरी राजा एकप्रकारे संकटात सापडला आहे.त्यामुळे अशा संकटात सापडलेल्या बळिराज्याच्या प्रश्नाकडे आपण गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे. हवे ते सोयाबीन व कपाशी वान बाजारात उपलब्ध होईल यावर पावाले उचलून कृषी केन्दा मार्फत जो बियानांचा कृतीम तुटोडा निर्मान केल्या जात आहे तो दुर करून शेतकरी राज्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले पाहिजे.

यामध्ये प्रशासनातील अधिकारी, कृषी विभागाचे अधिकारी कागदोपत्रीच कागदांचा बाजार मांडत असून, बाजारा मुबलक बियाने उपलब्ध असल्याचे शेतकऱ्यांना भासवत आहेत.एकप्रकारे ते शासनाची आणि शेतकऱ्यांची फसवणूकच करत आहे. कृषी विभागा मार्फत खोटी माहिती आणि चुकिची माहिती आपणाप्रयंत कागदोपत्री पोहचवल्या जात असून वास्तव मात्र वेगळ आहे.प्रत्येक तालुक्यातील अधीकारी आपणास कागदोपत्री खोटी माहीती देत आहे. हे जीवंत वास्तव सर्व शेतकऱ्यांनी जिल्हा आधिकारी यांना सांगितले. रुची १००१ सोयाबीनचे वाण व असेच आधिक उत्पन्न देणारे बियाने बिजारात उपलब्ध नाही तेव्हा अशा बियाण्याची उपलब्धता होण्यासाठी आपल्या स्तरावरुन त्वरीत पावले उचलावी,तसेच अनेक शेतकऱ्यांचे शेत रस्त्याचे दावे महसुल विभागाकळे अनेक वर्षापासुन प्रलबित आहे ते दावे पेरणी वजळ येवून सुद्धा प्रलंबीत आहे, त्याकळे सुद्धा आपन लक्ष देवुन प्रलंबीत दावे तात्काळ निकाली काढावे यासह अनेक समस्याचा पाढच जिल्हा अधिकाऱ्यांच्या समोर कथन केला.विशेषतः एक शेतकरी या नात्याने आर.पी.आय.युवा जिल्हा अध्यक्ष प्रशांत तायडे यांनी या महत्त्वाच्या मागणी साठी जिल्हा आधिकारी याची भेट घेवून चर्चा केली.व या बाबीकडे कलेक्टरचे लक्ष वेधले. शेतकऱ्यांना विश्वासात घेत जिल्हा अधीक्षक यांनी सांगितले की, कृषी विभागाला या बाबत अलंर्ट केले जाईल व प्रलंबित शेत रस्ते दावे बाबत जळगाव महसूल विभागाला तशा सुचणा केल्या. तसेच शेतकऱ्यानी जो प्रयत्न पेरणीयोग्य पाऊस होत नाही तोप्रयंत पेरणी करूच नका असा सल्लाही यावेळी कलेक्टर महोदयांनी शेतकऱ्यांना दिला. यावेळी प्रशांत तायडे, अक्षय पाटिल, भास्कर भटकर, प्रभाकर वानखडे, अनिकेत पाटील, बाळु दामोधर इत्यादी शेतकरी उपस्थीत होते





आषाडीनिमित्त खंडोबाच्या जेजुरीत वाघ्या मुरळींचा विठोबाचा नामगजर घातला. छायाचित्र : विजयकुमार हरिश्चंद्र

# स्कॉर्पिओने मोटरसायकलस्वारास उडविले

## पिलीव येथे तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**पिलीव :** पिलीवहून पंढरपूरकडे



जाणाऱ्या तरुणास पंढरपूर वरून भरधाव वेगाने येणाऱ्या स्कॉर्पिओ गाडीने विठ्ठलवाडी येथे जोराची धडक दिल्याने तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. सदर प्रकरणाची पिलीव पोलीसांकडून मिळालेली सविस्तर माहिती अशी की, बाबा बाळू चव्हाण, रा. हिंगणी, ता.माण, जि.सातारा हा तरुण आपल्या MH-11CM-0737 या क्रमांकाच्या HF डिलक्स या मोटारसायकलवरुन पंढरपूरला जात असताना पिलीव-पंढरपूर रोडवर विठ्ठलवाडी येथे पंढरपूरहून येणाऱ्या MH-42K-5490 या क्रमांकाच्या स्कॉर्पिओ गाडीने समोरुन जोराची धडक दिल्याने तरुणाचा सातारा येथील सिव्हिल हॉस्पिटलमध्ये उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. सदर प्रकरणाची माहिती मिळताच पिलीव औट पोस्टच्या कर्मचाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली व सदर प्रकरणाची चौकशी केली असता अपघातातील स्कार्पिओ गाडी ही विश्वजीत जयसिंग घोरपडे रा.भाडळी,ता. कोरेगाव, जि.सातारा यांची असल्याचे समजले यावेळी पिलीव पोलीसांनी लागलीच घोरपडे यांच्यावर माळशिरस पोलीस स्टेशनला गुन्हा नोंद केला असून अपघातातील स्कार्पिओ गाडी जप्त केली आहे.या प्रकरणाचा पुढील तपास पिलीव औट पोस्टचे हवालदार पंडित मिसाळ हे करीत आहेत. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

# बिडकीन परिसरात वीजपुरवठा उद्या बंद राहणार

आधुनिक केसरी न्यूज

**बिडकीन:** शहराच्या पाणीपुरवठा योजनेच्या कामात अडथळा ठरणाऱ्या विद्युत वाहिन्यांचे 31 जुलैपर्यंत स्थलांतर करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने दिले आहेत. त्यानुसार 30 जूनपासून महावितरण हे काम करणार आहे. त्यासाठी बिडकीन परिसरातील काही गावांत शुक्रवारी व रविवारी वीजपुरवठा बंद राहणार आहे. गरज भासल्यास आणखी तीन ते चार दिवस एका दिवसाआड वीज बंद राहील. या अतिमहत्त्वाच्या व अतितातडीच्या कामासाठी ग्राहकांनी सहकार्य करण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

औरंगाबाद शहराच्या पाणीपुरवठा योजनेसाठी विविध शासकीय विभागांना समन्वय ठेवून कामे निर्धारित वेळेत करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने दिलेले आहेत. त्यानुसार जायकवाडी ते औरंगाबाद शहरादरम्यान विद्युत वितरण वाहिन्या 31 जुलैपर्यंत स्थलांतरित करण्यात येतील, असे महावितरणतर्फे न्यायालयास सांगण्यात आले. यावर न्यायालयाने महावितरणला वीज बंद ठेवून काम करण्यास परवानगी दिलेली आहे. बिडकीन परिसरातील अलाना, चितेगाव, औरंगाबाद इलेक्ट्रिकल्स, व्हिडिओकॉन, बिडकीन व जयलक्ष्मी या 33 केव्ही वाहिन्या एकमेकांना समांतर व जवळ आहेत. त्या स्थलांतरित करण्यासाठी सुरक्षिततेसाठी बंद ठेवाव्या लागणार आहेत. त्यामुळे रविवारी ( 2 जुलै ) चितेगाव, पांगरा, फारोळा, शेकटा, लाखेगाव, चिंचोली, जामडी, निलजगाव, बोकुडजळगाव, बाभूळगाव, गेवराई तांडा, पैठणखेडा, नायगाव खंडेवाडी या गावांत तसेच चितेगाव-बिडकीन परिसरातील औद्योगिक ग्राहकांचा वीजपुरवठा बंद राहणार आहे. आवश्यकतेनुसार आणखी तीन ते चार दिवस एका दिवसाआड वीज बंद ठेवून विद्युत वाहिन्या स्थलांतरित करण्यात येतील. औरंगाबाद शहराच्या पाणीपुरवठा योजनेच्या अत्यावश्यक व अतितातडीच्या कामासाठी वीज बंद ठेवावी लागणार असल्याने उद्योजकांनी तसेच सर्व शासकीय यंत्रणांनी महावितरणला सहकार्य करावे. शहराच्या विकासासाठी होणारे नुकसान सहन करावे, अशी अपेक्षा उच्च न्यायालयाने व्यक्त केलेली आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार निर्धारित वेळेत हे काम पूर्ण करायचे असल्याने नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

# राजुरेश्वरनगर येथे आषाढीनिमित्त खुल्या जागेत वृक्षारोपण

आधुनिक केसरी न्यूज

**अंबड :** शहरातील राजुरेश्वर नगर येथे राजुरेश्वर मंदिर परिसरातील खुल्या जागेवरती नागरिकांच्या वतीने आषाढी एकादशीच्या निमित्ताने लिंब, पिंपळ, वड , उंबर इत्यादी वृक्षाची लागवड करण्यात आली. या वृक्षारोपण कार्यक्रमास अंबड येथील प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते डॉ राजेंद्र भाला , मराठवाडा मुक्तीसंग्राम अमृत महोत्सवी यात्रेचे प्रमुख श्री सुरेश मांटे ( बीड ), नगरसेवक श्री गंगाधर भाऊ वराडे, डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर चे सिनेट सदस्य प्रा नाना गोडबोले यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रमुख मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी मुख्याध्यापक श्री चव्हाण सर, जालना जिल्हा परिषदेचे श्री संतोष सावंत सर, डॉ मिसाळ, इंजिनीयर श्री संदीप टकले, श्री विजय भांडवले, काळे सर इत्यादी कॉलनीतील रहिवाशांनी सहभाग घेऊन, खड्डे खोदून वृक्षारोपण करण्यास सहकार्य केले व अतिथींचे स्वागत करून वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न झाला. या प्रसंगी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात श्री सुरेश मांटे यांनी मराठवाडा मुक्तीसंग्राम अमृत महोत्सवी वर्षानिमित्त संपूर्ण मराठवाड्यामध्ये रथयात्रा काढण्यात येणार असून या रथ यात्रेची सुरुवात 10 सप्टेंबर रोजी आंबेजोगाई येथून होणार आहे. यात्रेचा समारोप 17 सप्टेंबर रोजी संभाजीनगर येथे होणार आहे. ही यात्रा आपल्या अंबड शहरांमधून जाणार आहे. तरी सर्व नागरिकांनी यात्रेचे स्वागत करून सहभाग नोंदवावा असे आवाहन केले.





# महाराष्ट्र व गोवा प्रदेश कार्यालयाचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** संघटनेची सदस्यसंख्या ही त्या संघटनेची आत्मिक शक्ती असते. संघटनेच्या कार्यवाढीसाठी व विविध कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीसाठी साधनांची गरज असतेच.पुण्यात कार्यालय उपलब्ध झाल्याने वैचारिक साधनांची शिदोरी मिळेल.. असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पुणे महानगर संघचालक मा.रवींद्र वंजारवाडकर यांनी केले. अखिल भारतीय पूर्व सैनिक सेवा परिषदेच्या महाराष्ट्र व गोवा प्रांताच्या कार्यालयाच्या उदघाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. ३६, प्रार्थना, ईशदान सोसायटी, आनंदनगर मेट्रो स्टेशन जवळ, पौड रोड, पुणे - ३८ येथे हे कार्यलय असणार आहे. अखिल भारतीय पूर्व सैनिक परिषद ही राष्ट्रीय पातळीवर पूर्व सैनिकांसाठी कार्य करणारी नोंदणीकृत व केंद्र सरकारची एकमेव मान्यताप्राप्त संघटना असून पूर्व सैनिकांसाठी व त्यांच्या कुटुंबियांसाठी अनेक वर्षांपासून कार्यरत आहे. यावेळी व्यासपीठावर व्यासपीठावर महाराष्ट्र व गोवा राज्याचे अध्यक्ष एअर मार्शल प्रदिप बापट (निवृत्त),सचिव वीरेंद्र महाजनी ह्यांची मुख्य उपस्थिती होती.

आपले सैनिक सीमेवर आपले रक्षण करतांना आपण बघतोच पण अंतर्गत सुरक्षतेसाठी ह्या अखिल भारतीय पूर्व सैनिक सेवा परिषदेने समाजाचे नेतृत्व करावे. राष्ट्रीय आपत्तीमध्ये माजी सैनिकांचे योगदान खूप मोठे आहे. महाराष्ट्र व गोवा राज्याची ही संघटना राज्याचे व राष्ट्राचे प्रतिनिधित्व करेल.अशी अपेक्षा मा.रवींद्र वंजारवाडकर यांनी या वेळी व्यक्त केली.

कार्यालय उदघाटन प्रसंगी महाराष्ट्र व गोवा प्रांताचे अध्यक्ष एअर मार्शल प्रदीप बापट (निवृत्त),एअर व्हॉईस मार्शल जयंत इनामदार ( निवृत्त ),संस्थापक सदस्य एअर कमोडर अरुण इनामदार(निवृत्त),पश्चिम महाराष्ट्र सचिव निवृत्त कर्नल नरेश गोयल,सचिव वीरेंद्र महाजनी,एअर फोर्स असोसिएशनचे पदाधिकारी व निवृत्त विंग कमांडर सुहास फाटक,निवृत्त ब्रिगेडियर धनंजय विध्वांस,योगेश गोगावले,एअर व्हॉईस मार्शल नितीन वैद्य (निवृत्त),माजी सैनिक कल्याण संघटक दीपक शेळके,संजय गायकवाड,संघटन मंत्री अशोक बोराटे,डॉ मोरेश्वर गद्रे,माधव देशपांडे यांची मुख्य उपस्थित होती. कार्यक्रमास अखिल भारतीय पूर्व सैनिक सेवा परिषदेचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# आगामी काळात बहुजन समाज गुलमगिरीत सापडलेला असेल

## प्रा. डॉ. ऋषिकेश कांबळे यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** सध्याचे आपले शैक्षणिक धोरण दिशाहीन आणि कुचकामी असल्यामुळे आगामी २५ वर्षात आपला बहुजन समाज कष्टकरी, शोषित समाज मोठ्या गुलामगिरीच्या विळख्यात सापडलेला असेल, अशी भीती व्यक्त करणारे प्रतिपादन आंबेडकरी विचारवंत साहित्यिक तथा समीक्षक प्रा. डॉ. ऋषिकेश कांबळे यांनी केले. ते निळे प्रतीक संस्थेच्या वर्धापन दिन पुरस्कार सोहळ्याप्रसंगी कार्यक्रमात बोलत होते. निळे प्रतिक बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेतर्फे निळे प्रतीकच्या वर्धापन दिनानिमित्त राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. सतीश गायकवाड यांनी केले तर अध्यक्षस्थान पी.बी अंभोरे यांनी भूषविले. सदर कार्यक्रमात प्रमुख अतिथी वक्ते म्हणून बोलताना प्रा. डॉ. ऋषिकेश कांबळे म्हणाले की, १९२३ मध्ये देखील ब्रिटिश सरकारने सरकारी शाळा लोकल बोर्डाकडे हसतांरित केल्या. या निर्णयाची झळ बहुजन वर्गाला सहन करावी लागली. आजही १०० वर्षानंतर शिक्षणाची परिस्थिती ही केविलवाणी बनलेली आहे. सध्याचे शैक्षणिक धोरण हे बहुजन वर्गाच्या भवितव्यासाठी हानिकारक आहे.त्यामुळे बहुजन वर्ग आगामी २५वर्षात गुलामगिरीत अडकलेला असेल अशी भीती प्रा. डॉ. कांबळे यांनी व्यक्त केली. शिक्षणाचे महत्त्व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी तसेच महात्मा फुले,शाहू महाराजांनी ओळखलेले होते. शिक्षण प्रसारासाठी या महापुरुषांनी जोरदार प्रयत्न केले. मूकनायक या वृत्तपत्रासाठी राजर्षी शाहू महाराजांनी त्या काळात तीनशे रुपयांची धनराशी देऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना भरीव मदत केलेली होती. शाहू महाराज यांनी केलेली ही मदत सामाजिक जाणिवेतून केली होती याची आठवण कांबळे यांनी आपल्या भाषणातून करून दिली. समाजाने दातृत्व जपले पाहिजे असेही ते म्हणाले. प्रमुख उपस्थित असलेले सतीश गायकवाड म्हणाले की, निळा रंग हा सर्वसमावेशक आहे यावरूनच निळे प्रतीच्या वाटचालीचा अंदाज येतो.संपादक उच्चशिक्षित असून उत्कृष्ट काम करतआहे. समाजातील अनेक घटनांचे ते साक्षीदार आहेत. असे गायकवाड यांनी सांगितले. प्रास्तविक भाषण करताना रतनकुमार साळवें यांनी सांगितले की, वृत्तपत्र चालविताना व एखादा कार्यक्रम आयोजित करताना किती दमछाक होते याचा अनुभव मी आजच नव्हे तर मागील १४ वर्षापासून घेत आहे. यावेळी विचार पिठावर न्यायमूर्ती शंकर दाभाडे सह अनेकांची उपस्थिती होती न्याय मूर्ती शंकर दाभाडे, बाळुशेट आडगावकर यांचेही यावेळी भाषण झाले. या कार्यक्रमात ३० जणांचा पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला. यामध्ये समाजभूषण पुरस्कार, समाज रत्न पुरस्कार, साहित्यभूषण पुरस्कार, कर्मवीर दादासाहेब गायकवाड पुरस्कार, विद्रोही कवी नामदेव ढसाळ पुरस्काराचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमास ज्येष्ठ नेते रतन कुमार पंडागळे, वरिष्ठ पत्रकार ससो खंडाळकर, माणिक साळवे, ज्ञानेश्वर खंदारे, मुकुंद दादा सोनवणे, पंडित बोर्डे, प्रा.भारत शिरसाट, दौलत मोरे, रशपालसिंग अटल, प्रा.अंकुश शिंदे, व्ही के वाघ,आनंद बोरडे,अँड. रामटेके, लक्ष्मण भुतकर, कडुबाई खरात,मुकुंद सुरडकर,देविदास कोळेकर आर.बी.वानखेडे,सुधाकर आठवले,सुदाम मगर,लक्ष्मण भुतकर, आनंद बोरडे, बाजीराव सोनवणे,महेश मुरकुटे, बबन सोनवणे,संजय सोनखेडे,वसंत शिरसाट, गजानन इंगळे, भीमराव गाडेकर, सुधाकर निसर्गन, सुदाम मगर, अँड रामटेके, राजेश भोळे आदीसह मोठ्या संख्येने उपस्थिती होती. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राहुल गवळी, टिनू साळवे, सोनू साळवे, सागर साळवे, अंश पवार, रतन गायकवाड, हिरासिंग महाले आदींनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पंकज शिंदे यांनी केले तर आभार राहुल गवळी यांनी मानले.

# आषाढी एकादशीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**चारठाणा :** येथील पुण्य पावन संत भुमीत आज आषाढी एकादशीनिमित्त येथील पेठ विभाग माळी गल्लीतील पुरातन काळापासून असलेले श्री विठ्ठल रुख्मीणी मंदीरात सकाळी अभिषेक करण्यात आला. तसेच या मंदीरातून सकाळी ११वाजता (चारुक्षेत्र) चारठाणा नगरीला नगर प्रदक्षणाला प्रस्थान वेळेस येणाऱ्या सर्व भजनी मंडळाला व जमलेल्या भाविक भक्तांना येथील पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक बालाजी गायकवाड यांच्या वतीने या सर्वांना ऊपवासाचा फराळाची व्यवस्था करण्यात आली. ही नगर प्रदक्षणा टाळ, विणा, मृदुंग व हरिनाम गजरात, विठ्ठल नामाच्या घोषात ही मिरवणूक जात आसताना या मिरवणूक मार्गावर येथील परिसरातील सदाशिव देशमुख, आत्माराम मेहेत्रे,विलास देशमुख, यांच्यासह अनेक भाविकांकडून फराळ, चहा, पाण्याची सोय करण्यात आली या प्रदक्षणा दिंडीत स.पो.नि.बालाजी गायकवाड यांच्या पत्नी आदर्श शिक्षिका संगिता बालाजी गायकवाड यांनी टाळ,विणा मृदुंग व हरिनामाच्या गजरात मिरवणुकीत ठेका देत फुगडी खेळत आनंद घेतला,या नगर प्रदक्षणा दिंडीत येथील संत सावता महाराज मंदिर संस्थान अध्यक्ष भगवानराव राऊत, बापुराव जाधव महाराज,बसुअप्पा तमशेटे, चव्हाण, शातंया स्वामी, ओमप्रकाश लोखंडे, नरहरी जोशी, सदाशिव देशमुख ,जगन्नाथ क्षीरसागर, शिवाजी देशमुख ,शाहीर



रघुनाथअप्पा क्षिरसागर, हरिभाऊ क्षीरसागर मुरलीधर करसकर, किसन मस्के, नामदेव राऊत, विठ्ठल घाटुळ,कृष्णा सोनटक्के , ज्ञानेश्वर कटारे, विश्वनाथ काळे, संतोष काळे, आश्रया स्वामी, प्रल्हाद पातरफळे, डिंगाबर लोखंडे, जगदीश देशमुख, बबनराव देशमुख, मधुकर राऊत, मुकुंद भाग्यवंत क्षीरसागर, भरत राऊत, लक्ष्मण राऊत,राहुल ईगंळे, ऊदय लोखंडे, काळे, देशमुख, चव्हाण, यांच्यासह, गोकुळेश्वर भगवान महादेव भजनी मंडळ, गणपती भजनी मंडळ, मारोती मंदिर भजनी मंडळ, सावता महाराज भजनी मंडळ, बसवेश्वर महाराज भजनी मंडळ व मोहाडी भजनी मंडळ, सावंग भजनी मंडळी व सर्व भाविक भक्त या नगर प्रदक्षणा दिंडीत शेकडोंच्या संख्येने सहभाग नोंदवला.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | अॅल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर